नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ०१ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## गारपीटीने शेतकऱ्यांना फटका

### २०३ गावातील १० हजार ८७८ हेक्टर क्षेत्र बाधीत



**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

जिल्ह्यात काल, सोमवारी सायंकाळी व रात्री झालेली गारपीट, अवकाळी पावसामुळे ९ तालुक्यातील २०३ गावे बाधित झाली आहेत. या तालुक्यातील २१ हजार ५६४ शेतकऱ्यांचचे १० हजार ८७८ हेक्टर क्षेत्रातील शेती पिकांचे नुकसान झाल्याचे कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार आढळले आहे. गहू, कांदा, मका, टरबुज, आंबा, द्राक्षे आदी पिकांचे नुकसान झाले आहे. वीज पडून २ व्यक्तींसह १० जनावरे दगावली आहेत.

गेल्यावर्षी पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीतून शेतकरी कसाबसा सावरत असतांना गेल्या दिड. १९ मार्चपासून जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने वेळोवेळी शेती पिकांचे नुकसान सुरू आहे. भारतीय हवामान विभागाने उद्या, बुधवारी व परवा, गुरुवारी जिल्ह्यात पावसाचा अंदाज वर्तवला आहे. गेल्यावर्षी जिल्ह्यात सर्वच तालुक्यांना अतिवृष्टीने चांगले झोडपून काढले होते. त्यावेळी खरीपाचे मोठे नुकसान शेतकऱ्यांना सहन करावे लागले. खरीप वाया गेल्याने आता रब्बी तरी हाताशी लागेल, अशी आशा शेतकऱ्यांची होती. पण अवकाळीने हातातोंडाशी आलेला घास पुन्हा हिरावून घेतला आहे. काल झालेली गारपीट व पावसाने सर्वाधिक नुकसान अकोले तालुक्याचे झाले. ७४ गावांमधील ९ हजार ६२२ शेतकऱ्यांचे ४ हजार ४० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. त्याखालोखाल श्रीरामपूर तालुक्यात ४७ गावे बाधित झाले असून २ हजार ३३२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान होऊन ४ हजार ८६ शेतकऱ्यांना फटका बसला आहे. नेवासा तालुक्यातील ३७ गावामधील ४ हजार ११२ शेतकऱ्यांचे २ हजार ३६५ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. संगमनेर तालुक्यात १२ गावे बाधित झाले असून २ हजार १०६ शेतकऱ्यांचे १ हजार २१७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. राहाता तालुक्यात १५ गावामधील ९६५ शेतकऱ्यांचे ६२२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. शेवगाव तालुक्यातील ८ गावांमधील ५२५ शेतकऱ्यांचे २४८ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. पाथर्डी तालुक्यात १ गावांतील ४ शेतकऱ्यांचे २ हेक्टर क्षेत्राचे तर कर्जत तालुक्यात २ गावांतील ४ शेतकऱ्यांचे ३.२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. कोपरगाव तालुक्यात ७ गावे बाधित झाले असून १४० शेतकऱ्यांचे ४८ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. यात ३३ टक्केपेक्षा कमी २ हजार २४४ हेक्टर क्षेत्र असून ४ हजार ४३४ शेतकरी संख्या आहे. तर ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान १७ हजार १३० शेतकऱ्यांचे ८ हजार ६३५ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

#### २३ घरांची पडझड

जिल्ह्यात दोन दिवसांपासून झालेल्या पावसात पाथर्डी आणि राहाता तालुक्यातून प्रत्येकी एक असे दोघांचा वीज पडून मृत्यू झाला तर राहात्यात एक जखमी झालेला आहे. राहाता तालुक्यात ९ मोठी जनावरे तर राहुरीत १ असे १० मोठी जनावरे मृत्यूमुखी पडली तसेच १२ घरांची अंशतः पडझड झाली. यात नेवासा ३, पारनेर १, पाथर्डी ४, राहाता १२ अशा २४ घरांची पडझड, संगमनेर तालुक्यात सहा ठिकाणी जनावरांचे गोठे पडले आहेत.

#### तातडीने पंचनामे करा- राधाकृष्ण विखे

अवकाळी पावसाने शेती पीकांचे तसेच नागरीकांच्या झालेल्या अन्य नूकसानीचे वस्तूनिष्ठ पंचनामे महसूल व कृषी विभागाने तातडीने सुरू करावेत, नूकसानग्रस्तांना स्थायी आदेशाप्रमाणे मदत उपलब्ध करून देण्याच्या सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही मंत्री विखे यांनी दिली.

## तुकाराम मुंढे यांची पुन्हा बदली

### राज्य प्रशासनात मोठे फेरबदल



**मुंबई : (स. गांवकरी)**

दिव्यांग कल्याण विभागाचा कायापालट करतानाच बोगस संस्थांची दुकानदारी बंद करणारे दिव्यांग कल्याण विभागाचे धडाडीचे सचिव तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली असून त्यांच्याकडे आता आपत्ती व्यवस्थापन विभागाची जबाबादारी सोपविण्यात आली आहे. तर मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिवपदी लोकेश चंद्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन संपताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी राज्य प्रशासनात मोठे फेरबदल केले असून मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिव अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांची बदली करण्यात आली आहे. विकास चंद्र रस्तोगी यांची वित्त विभागात अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), श्रीमती विनिता वैद सिंघल प्रधान सचिव यांची मृद व जलसंधारण विभागात बदली करण्यात आली आहे. परिमल सिंग यांची सचिव (कृषी) म्हणून तर तुकाराम मुंढे यांची सचिव, आपत्ती व्यवस्थापन येथे नियुक्ती करण्यात आले आहे.

लहू माळी यांची व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वासन प्रकल्प लिमिटेड,माणिक गुरसाल यांची सचिव, दिव्यांग कल्याण विभागात तर श्रीमती प्रेरणा देशभ्रतार सह आयुक्त, राज्य कर, मुंबई यांची आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पृथ्वीराज बी. पी. अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची महापालिका आयुक्त, वसई विरार महानगरपालिका म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### धोमचे पाणी नदीत सोडण्याचा प्रकार

सातारा (स. गांवकरी) : अंबवडे संमत कोरेगावच्या हद्दीत धोम धरणाच्या डाव्या कालव्यावरील पाणी सोडण्याच्या दरवाजाची साखळी आणि कुलूप अज्ञातांनी तोडून कालव्यातील पाणी वांगणा नदीत सोडले. त्यामुळे वांगणा सिंचन योजना बंद पडल्या व डाव्या कालव्याचे आवर्तन विस्कळीत झाले. याप्रकरणी कोरेगाव पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, अंबवडे संमत कोरेगावच्या हद्दीमध्ये धोम डावा कालवा साखळी क्रमांक ५१/००० येथे कोणीतरी अज्ञात इसमाने कशाच्या तरी साहाय्याने पाणी सोडण्याच्या दरवाजाची (अतिवाहक दार) साखळी आणि कुलूप तोडून कालव्यातील पाणी वांगणा नदीत सोडल्याने कालव्यावरील वांगणा सिंचन योजना बंद पडल्या व डाव्या कालव्याचे आवर्तन विस्कळीत झाले. त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या पिकांचे, तसेच सार्वजनिक मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.

### वार्षिक बाजारमूल्य दर 'जैसे-थे'

पुणे (स. गांवकरी) : आगामी आर्थिक वर्षासाठी (२०२६-२७) राज्य शासनाकडून वार्षिक बाजारमूल्य दर (रेडिरेकनर) गेल्या वर्षीप्रमाणेच (२०२५-२६) कायम ठेवण्यात आले आहेत. 'रेडीरेकनर'च्या दरांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने बांधकाम क्षेत्रासह घर खरेदी करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. दरम्यान, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात (३० मार्च २०२६ पर्यंत) राज्य शासनाला एकूण ६० हजार ५६८.९४ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. यामध्ये सर्वाधिक वाटा 'आय-सरिता'प्रणालीचा असून, त्याद्वारे ४९ हजार ५३४ कोटींचा महसूल जमा झाला आहे. आगामी आर्थिक वर्षासाठी (२०२६-२७) राज्य शासनाकडून वार्षिक बाजारमूल्य दरात (रेडिरेकनर) वाढ करण्याचा प्रस्ताव राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने राज्य शासनाला दिला होता. त्यानुसार पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात सरासरी आठ ते दहा टक्के, तर राज्यात सरासरी पाच ते आठ टक्के वाढ करण्याचे प्रस्तावित होते.

### थोरात यांचे उच्च न्यायालयात आव्हान

संगमनेर (स. गांवकरी) : संगमनेर विधानसभा निवडणुकीचा निकाल आता न्यायालयीन कचाट्यात सापडला आहे. काँग्रेसचे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आमदार अमोल खताळ यांनी आपले उत्पन्न लपविल्याबाबतची याचिका दाखल केली आहे. थोरात यांनी दाखल केलेली निवडणूक याचिका फेटाळण्यासाठी आमदार खताळ यांनी न्यायालयाकडे केलेला अर्ज फेटाळण्यात आल्याने या खटल्यातील रंगत वाढणार आहे. न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठासमोर या खटल्याची सुनावणी सुरू आहे.

### न्यायालयात आव्हान

अलिबाग (स. गांवकरी) : मुरुड येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता श्रद्धा दिलीप बोऱ्हाडे यांना २ लाख ५० हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. या कारवाईमुळे मुरुडसह परिसरातील शासकीय कार्यालयांत एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एका ठेकेदाराने एकदरा, राजपुरी आणि खोकरी या गावांतील रस्त्यालगत स्लॅब ड्रेनचे काम पूर्ण केले होते. संबंधित कामाचे पूर्ण बिल व अंदाजपत्रक तयार करून देण्यासाठी कनिष्ठ अभियंता श्रद्धा बोऱ्हाडे यांनी तक्रारदाराकडे प्रथम ३ लाखांची मागणी केली.

## आर्थिक वर्षाच्या अखेरीस निधीसाठी धावाधाव

**मुंबई : (स. गांवकरी)**

आर्थिक वर्षाच्या अखेरीस निधी खर्ची दाखविण्यासाठी मंत्रालयात सोमवारी अनेक विभागांची धावपळ सुरु होती. खात्याला मिळालेल्या निधी व्यपगत होऊन परत जाऊ नये यासाठी विविध योजना आणि प्रकल्पांवर निधी खर्ची दाखविण्यासाठी गेल्या दोन दिवसांत तब्बल ५०० हून अधिक शासन निर्णय(जीआर) निर्गमित करण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष संपत असताना विभागाला मिळालेला निधी खर्च करण्यासाठी मंत्रालयातील सर्वच विभागात गेल्या दोन दिवसांपासून धावपळ सुरू आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर पडणारा ताण लक्षात घेऊन वित्त विभागाने यंदा सर्वच विभागांच्या खर्चावर काहीप्रमाणात निर्बंध आणले होते. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत अनेक विभागाना मिळालेला निधी खर्च करता आलेला नव्हता. मंगळवारी ३१ मार्च असला तरी महावीर जयंतीची सुट्टी असल्याने आजच आर्थिक वर्षाचा अखेरचा दिवस असल्याचे मंत्रालयात लगबग सुरू होती. निधी ३१ मार्चच्या आत खर्च झाला नाही तर तो व्यपगत होईल या धास्तीने ग्रामविकास, पर्यटन, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, सामाजिक न्याय आदी विभागांमध्ये धावपळ सुरु असून गेल्या दोन दिवसात सातत्याने निधी खर्चाबाबतचे शासन निर्णय काढले जात आहेत. आज दिवसभरात अशाचप्रकारे निधी तरतूद किंवा खर्चाचे तब्बल ३७० शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून यात प्रामुख्याने सहकार, सामान्य प्रशासन, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, उच्च आणि तंत्रशिक्षण, पर्यटन, नगरविकास आदी विभाग आघाडीवर होते.



## तीन राज्यात ४३ नक्षल्यांची रोकड आणि सोन्यासह शरणागती

### देश नक्षलमुक्तीच्या शेवटच्या टप्प्यात?

**गडचिरोली : (स. गांवकरी)**

देशातील नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेल्या ३१ मार्च या 'डेडलाईन'च्या दिवशी आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि गडचिरोलीत ४३ नक्षलवाद्यांनी एकूण ३ कोटी रोकड ७ किलो सोन्यासह आत्मसमर्पण केले.

देशातील १७० जिल्ह्यात एकेकाळी सत्तेला समांतर व्यवस्था राबवणाऱ्या नक्षलवादी चळवळीचे अस्तित्व आता केवळ दोन बड्या नेत्यांच्या अटकेवर अवलंबून असून, 'लाल गड' पूर्णपणे ढासळला असल्याचे चित्र आहे. मात्र, गृहमंत्र्यांनी दिलेल्या कालमर्यादेत देश नक्षलमुक्त झालेला नाही.

गेल्या ३६ वर्षांपासून पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकून वावरणारा कुख्यात नक्षलवादी नेता सी. नारायण राव ऊर्फ सुरेश याने आंध्रप्रदेश पोलिसांसमोर आपल्या आठ सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले. १.५ कोटींचे बक्षीस असलेला सुरेश २०१८ मधील विशाखापट्टणम येथील आमदार किदारी सर्वेश्वर राव यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार होता. या कारवाईमुळे आंध्र प्रदेश आता पूर्णपणे 'नक्षलमुक्त' झाल्याचा दावा पोलीस महासंचालक हरीश कुमार गुप्ता यांनी केला आहे.

गडचिरोली आणि छत्तीसगडच्या सीमावर्ती भागात छत्तीसगडमधील ९ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे शस्त्रे टाकून आत्मसमर्पण केले. त्यामुळे गडचिरोलीत आता एकही सक्रिय नक्षल नसून पोलीस दरबारी नोंद असलेले सहा जण भूमिगत आहेत. त्याचवेळी छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात दण्डकारण्य स्पेशल जोनल कमिटीचे २५ जहाल नक्षलवाद्यांनी, मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला आहे. या शरणागतीमुळे नक्षलवाद्यांचे लष्करी बळच नाही, तर आर्थिक कंबरडेही मोडले आहे.



सुरक्षा दलांनी या कारवाईत तब्बल १४.०६ कोटी रुपयांची विक्रमी मालमत्ता जप्त केली आहे. यात २.९० कोटींची रोख रक्कम आणि ११.१६ कोटी रुपये मूल्याचे ७.२० किलो सोने हस्तगत करण्यात आले आहे. तसेच एके-४७, एलएमजी, एसएलआर आणि इन्सास सारखी ९३ घातक शस्त्रेही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. २००४ मध्ये पीपल्स वॉर ग्रुप आणि माओइस्ट कम्युनिस्ट सेंटरच्या विलीनीकरणानंतर 'भाकपा (माओवादी )' हा पक्ष आकाराला आला होता. मुप्पाला लक्ष्मण राव ऊर्फ गणपतीच्या काळात ही चळवळ १७० जिल्ह्यांपर्यंत फोफावली होती. मात्र, २१ मे २०२५ रोजी नंबला केशव राव ऊर्फ बसव राजूचा खात्मा झाल्यानंतर या चळवळीच्या पडझडीला वेग आला. पोलिसांच्या वाढत्या दबावामुळे दुसऱ्या फळीतील भूपती, देवजी यांसारख्या नेत्यांनी आधीच आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारला आहे.

## रुग्णालयात मृतदेहांची पुन्हा अदलाबदल!


### नातेवाईकांचे धरणे आंदोलन; दोन कर्मचारी निलंबित

**सातारा (स. गांवकरी)**

क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालयामध्ये कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मंगळवारी मृतदेह सकाळी नातेवाईकांच्या ताब्यात देताना अदलाबदली होण्याचा पुन्हा एकदा प्रकार घडल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले. संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयात धरणे आंदोलन केले. जिल्हा रुग्णालयात मृतदेहांची अदलाबदल होण्याचा या महिन्यातील हा दुसरा प्रकार आहे. दरम्यान या प्रकरणाची जिल्हा शल्य चिकित्सक डॉ युवराज करपे यांनी गंभीर दखल घेत शंकर शिंदे आणि विशाल रावखंडे या दोन कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित केले आहे.

सोनगरवाडी (ता. वाई) येथील आनंद ओव्हाळ (वय २६) यांनी विषप्राशन केल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेल्या आठ दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. सोमवारी रात्री त्यांचे निधन झाले, तर आरळे (ता. सातारा) येथील सुरेश मस्कु खोमणे (वय ५१) हे मागील तीन दिवसांपासून उपचार घेत होते. उपचारादरम्यान सोमवारी रात्री त्यांचे निधन झाले. दोन्ही मृतदेहांचे रात्रीच शवविच्छेदन करून ते सकाळी नातेवाईकांना देण्यात आले. सोनगिरवडी वाई येथील आनंद ओव्हाळ यांचा मृतदेह घरी आणून त्याच्यावर अंत्यसंस्काराची तयारी करण्यात आली. स्मशानभूमीत अंत्यसंस्कारापूर्वी मृत ओव्हाळ यांच्या आजीने नातवाचा चेहरा पाहायचा आहे, अशी इच्छा व्यक्त केली. त्यावेळी हा आपल्या नातवाचा मृतदेह नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. यानंतर नातेवाईकांमध्ये एकच गोंधळ उडाला. त्यांनी तत्काळ जिल्हा रुग्णालयाशी संपर्क साधला असता त्यांना मृतदेह पुन्हा साताऱ्याला घेऊन येण्यास सांगण्यात आले.

दरम्यान, जिल्हा रुग्णालयाने खोमणे यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधून मृतदेहाचे अदलाबदल झाल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी खोमणे यांच्या अंत्यसंस्कारासाठी पेटवलेली चिता विझवून आणलेला मृतदेह परत रुग्णालयात आणण्यात आला. दुपारी त्यांच्या-त्यांच्या नातेवाईकांच्या योग्य मृतदेह ताब्यात देण्यात आल्यानंतर मृतांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. दुपारपर्यंत जिल्हा रुग्णालयात तणावपूर्ण वातावरण होते त्यामुळे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता.



#### कर्मचाऱ्यांची खडाजंगी

सोनगीर वाडी येथील मृत्युमुखी पडलेल्या आनंद ओव्हाळच्या नातेवाईकांनी संबंधित प्रकाराबाबत संताप व्यक्त करत रुग्णालय व्यवस्थापनाच्या कर्मचाऱ्यांशी जोरदार वाद घातला. मृतदेहाचा चेहरा दाखवण्यात न आल्यामुळेच हा प्रकार घडल्याचा संताप व्यक्त करत संबंधित कर्मचाऱ्यांना ताबडतोब आमच्या समोर आणा, अशी मागणी केली. जिल्हा रुग्णालयात दोन्हीकडच्या नातेवाईकांची मोठी गर्दी जमा झाली. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. हा गंभीर प्रकार समोर येताच सातारा पोलीसही घटनास्थळी उपस्थित झाले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे यांनी या प्रकरणांस जबाबदार असलेल्या शंकर शिंदे आणि विशाल रावखंडे या दोन कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित केले. तसेच याबाबतचा अहवाल वरिष्ठांना सादर करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



# जन्मशताब्दीनिमित्त कर्तृत्वान महिलांचा सन्मान

पुणे: (स. गांवकरी)



कै. सुधाकर वामन खंडागळे अध्यासन, दुर्गम प्रतिष्ठान, उत्कर्ष महिला मंडळ आणि लायन्स क्लब ऑफ पुणे सहकारनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भरत नाट्य संशोधन मंदिर यांच्या सहकार्याने प्रख्यात शास्त्रीय गायिका माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा व 'स्वरगंध' प्रस्तुत 'गंधार रंजन 2026' हा संगीत कार्यक्रम भारत नाट्य मंदिर येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत दगडूशेठ ट्रस्ट मंडळाचे अध्यक्ष सुनील रासने होते. त्यांच्या हस्ते तसेच भरत नाट्य संशोधन मंदिराचे अध्यक्ष पांडुरंग मुखडे आणि लायन्स क्लब ऑफ पुणे सहकारनगरचे मिलिंद तलाठी यांच्या उपस्थितीत कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी कै. सुधाकर वामन खंडागळे अध्यासनचे अध्यक्ष डॉ. प्रसाद खंडागळे, दुर्गम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नंदकुमार जाधव, उत्कर्ष महिला मंडळ व आधार सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष दिलीप काळोखे, रवींद्र पठारे, प्रतिशिर्डी संस्थानचे विश्वस्त रवी जाधव, नीलम खंडागळे, सविता काळोखे, उल्हास कदम, अशोक जाधव, पुरन हुडके आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माणिक वर्मा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रत्नप्रभा गिरे (सांप्रदायिक कार्य), लता जाधव (चित्रपट निर्मिती), सुनंदा मोरे (सामाजिक कार्य), हेमा टाकळीकर (पाककला प्रशिक्षिका), विद्या ताम्हणकर (पुणेरी सुगरण संस्था), स्वाती शेठ (सामाजिक कार्य), विभावरी जाधव (अध्यक्षा, प्रतीशिर्डी संस्थान), ईशा पठारे (राज्यस्तरीय खेळाडू), कल्याणी कदम (महिला मंच) आणि विजया झेंडे (बाल संगोपन केंद्र) यांचा सन्मान करण्यात आला. प्रख्यात गायिका माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दीच्या औचित्य साधून चार सामाजिक संस्थेने दिलेले पुरस्कार ऊर्जा देणारे आहेत. आमच्या क्षेत्रात काम करण्यास आणखी बळ मिळाले असल्याचे यावेळी महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. प्रसाद खंडागळे यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप काळोखे यांनी केले. नंदकुमार जाधव यांनी आभार मानले.

यानंतर 'गंधार रंजन 2026' या कार्यक्रमात दोन गंधारांचा प्रयोग असलेल्या रागांच्या बंदिशी, नाट्यगीते आणि भक्तिगीतांचा सुरेल आविष्कार सादर करण्यात आला. गायिका डॉ. राजश्री महाजन आणि गायक सोमनाथ जायदे यांनी 'लाविते मी निरांजन त्या सावळ्या तनूचे', कौसल्येचा राम, वृंदावनात माझ्या, एक धागा सुखचा, जाने कहाँ, कही दीप जले ही गीतांसह जाग, शिवरंजनी, तराणा, मिश्र किरवाणी व भैरवीची रचना त्यांनी सादर केली. कौसल्येचा राम हे व्हायोलिन व हार्मोनियमवर माधवी करंदीकर व डॉ. नीलिमा राडकर यांनी सादर करुन प्रक्षेकांचे मने जिंकली. कार्यक्रमात माणिक वर्मा यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या संगीत प्रवास उलगडण्यात आला. त्यांना अभिजित जायदे (तबला), डॉ. नीलिमा राडकर (व्हायोलिन) आणि माधवी करंदीकर (हार्मोनियम) यांची साथसंगत लाभली. यशश्री पुणेकर यांनी निवेदन केले.

# दक्षिणमुखी मारुती मंदिरात त्रिदिनात्मक सोहळयास ध्वज पूजनाने प्रारंभ

नेवासा: (स. गांवकरी)



श्री हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्त तीर्थक्षेत्र नेवासा बुद्रुक येथे श्री समर्थ रामदास स्वामींनी स्थापित केलेल्या जागृत अशा दक्षिणमुखी मारुती मंदिरामध्ये त्रिदिनात्मक सोहळयास हभप कोंडीराम महाराज पेचे व देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे यांच्या हस्ते धर्म ध्वज पूजनाने मंगळवारी उत्साहात प्रारंभ करण्यात आला. सदर त्रिदिनात्मक सोहळयात पहाटे ४ ते ६ काकडा भजन,६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम,सकाळी ७ ते १० ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायाचे पारायण,सायंकाळी ५ ते ६ महिला भजनी मंडळाचे हरिपाठ,रात्री ७ ते ८ प्रवचन तदनंतर रात्री ८ ते ११ हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम व्यासपीठ चालक हभप कोंडीराम महाराज पेचे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरे होणार आहे.

गुरुवार दि.२ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता पुष्पवृष्टी करून श्री हनुमंतरायांचा जन्मोत्सव साजरा होणार असून सकाळी ९ ते ११ यावेळेत पारायण व्यासपीठ प्रमुख हभप कोंडीराम महाराज पेचे यांच्या होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने त्रिदिनात्मक हनुमान जन्मोत्सव सोहळयाची सांगता होणार आहे. त्रिदिनात्मक पारायण सोहळयाच्या निमित्ताने होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थान अध्यक्ष, सचिव व विश्वस्त मंडळांचे सदस्य व नेवासा बुद्रुक ग्रामस्थांनी केले आहे.

# महावीर जन्मकल्याणक दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा: (स. गांवकरी)



श्री सकल जैन श्रावक संघ, श्रीगोंदा यांच्या वतीने जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक दिन आज शहरात भक्तिमय वातावरणात आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी साडेपाच वाजता दैनंदिन प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सकाळी साडेसात ते दहा या वेळेत शहरातून भव्य, दिव्य व शिस्तबद्ध शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी बांधव व भगिनींचा एकसमान पेहराव आणि उत्कृष्ट नियोजन होते. शोभायात्रेदरम्यान विविध ठिकाणी नागरिकांच्या वतीने पाणी, आईस्क्रीम व शीतपेयांचे वाटप करण्यात आले. तसेच, कोणताही कचरा न करता स्वच्छतेचा संदेश देत जैन बांधवांनी समाजापुढे आदर्श निर्माण केला. शोभायात्रा जैन स्थानकात पोहोचल्यानंतर भक्तिमय वातावरणात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी अमरावती (बडनेरा) येथील श्री निर्मलजी छाजेड व श्री मनोजजी पटेरिया यांनी आपल्या सुमधुर वाणीतील प्रवचन व भक्तिगीतांच्या माध्यमातून भगवान महावीरांचा संदेश उपस्थितांना प्रभावीपणे मांडला. कार्यक्रमाला परिक्रमा ग्रुपच्या सौ. प्रतिभाताई पाचपुते, नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस, उपनगराध्यक्ष सौ. अलकाताई अनभुले, गटनेत्या मीराताई शिंदे, नगरसेवक एम. डी. शिंदे, सुशीलकुमार शिंदे, सागर गोरे, प्रशांत गोरे, महावीर पटवा, टिळक भोस, आघाव भाऊसाहेब, गोपाळराव मोठे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. याच दिवशी जैन संघाचे युवक कार्यकर्ते व सद्भावना मित्र मंडळाच्या सदस्यांनी वडाळी रोडवरील अभयारण्यात वन्यजीवांसाठी तयार करण्यात आलेल्या पाणवठ्यात टँकरद्वारे पाणी सोडण्याचा उपक्रम राबवला. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी अध्यक्ष विजयजी बोरा, विजय मुथा, सुरेंद्र गांधी, गणेश गुगळे, नवनीत मुनोत, संतोष भंडारी, दीपक भंडारी, संदीप कोठारी, सुनील भंडारी यांच्यासह कार्यकारिणी सदस्य व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# राज्यात गारपीटीचा हाहाकार

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

मागील काही दिवसांपासून हवामानात सतत बदल होताना दिसत आहेत. त्यामध्येच भारतीय हवामान विभागाने धोक्याची घंटा वर्तवली आहे. गारपिटीसह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात आज वादळी पाऊस आणि गारपिटीचा ऑरेंज अलर्ट भारतीय हवामान विभागाने दिला. संपूर्ण राज्यात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला. आज मार्च महिन्याचा शेवटचा दिवस आहे, तरीही पाऊस काही जाण्याचे नाव घेत नाही. परभणी, बीड, जळगाव, पुणे, सातारा, नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जालना या जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने पावसासह गारपिटीचा ऑरेंज अलर्ट जारी केला. बाकी संपूर्ण राज्यात आज पावसाचा येलो अलर्ट आहे.

# पुण्याचे लाडके 'शौकीन फॅमिली पान' खेड शिवापूरमध्ये

## ५० हून अधिक चवींची आकर्षक मेजवानी

पुणे: (स. गांवकरी)



पुण्याच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीत वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'शौकीन फॅमिली पान' या उपक्रमाने विस्ताराच्या नव्या टप्प्यात प्रवेश केला आहे. शहरातील नळ स्टॉप येथून सुरू झालेल्या या लोकप्रिय पान उपक्रमाची २८ मार्च २०२६ रोजी खेड शिवापूर येथे नव्या शाखेच्या उद्घाटनाने भर पडली आहे. पुणे–बंगळूर महामार्गावरील हॉटेल जगदंबा परिसरात ही शाखा सुरू करण्यात आली आहे.

'शौकीन पान'चे वैशिष्ट्य म्हणजे येथे उपलब्ध असलेली सर्व पाने शंभर टक्के तंबाखूमुक्त असून ती नैसर्गिक घटकांपासून तयार केली जातात. त्यामुळे आरोग्यदायी व सुरक्षित पर्याय म्हणून ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

या ठिकाणी पारंपरिक विड्यांसह 'फायर पान', 'चॉकलेट पान' आणि 'गोल्ड लीफ पान' अशा ५० हून अधिक विविध चवींची मेजवानी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, पुण्यातील पहिले 'फॅमिली पान शॉप' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या उपक्रमात महिलांसाठी व लहान मुलांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि आनंददायी वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सध्या पुण्यात कोथरूड, बाणेर, हडपसर, वाकड, सिंहगड रस्ता, बावधन तसेच पिंपरी-चिंचवड परिसरात या पान उपक्रमाच्या शाखा कार्यरत आहेत. याशिवाय मुंबईतील दादर येथेही या उपक्रमाने यशस्वी पाऊल ठेवले आहे.

सन २००५ मध्ये उद्योजक शरद मोरे यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाने पारंपरिक पानाला 'मिष्टान्न पान' अशी नवी ओळख दिली आहे. बदलत्या ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन 'शौकीन पान' आता ऑनलाईन माध्यमावरही उपलब्ध असून ग्राहकांना घरपोच सेवेद्वारे या विशेष पानांचा आस्वाद घेता येत आहे. खेड शिवापूरमधील नव्या शाखेमुळे 'शौकीन फॅमिली पान'चा विस्तार अधिक बळकट झाला असून भविष्यात महाराष्ट्रासह देशभरात विस्तार करण्याचा मानस व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

# त्रिदिनात्मक अखंड हरिनाम सप्ताहास धर्म ध्वजारोहणाने प्रारंभ



नेवासा: (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील आदर्शगाव सुरेशनगर येथील हनुमान मंदिरामध्ये हनुमान जयंती निमित्त त्रिदिनात्मक अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयास संत महंतांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण करून मंगळवार दि.३१ मार्च पासून प्रारंभ झाला. यावेळी झालेल्या धर्म ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी त्रिवेणीश्वर महादेव देवस्थानचे महंत स्वामी श्री रमेशानंदगिरीजी महाराज, मध्यमेश्वर देवस्थानचे महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज, शिनाई देवस्थानचे उत्तराधिकारी श्री आवेराज महाराज, संतसेवक हभप लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,हभप विष्णूदास महाराज सांगळे, पारायण व्यासपीठ प्रमुख हभप नितीन महाराज हारकळ, सरपंच सौ. शैलाताई उभेदळ व कल्याणराव उभेदळ, बन्सीभाऊ आगळे यांच्या हस्ते धर्म ध्वजाचे पूजन करण्यात येऊन ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी झालेल्या धर्म ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी आलेल्या सर्व संत मंडळीसह मान्यवरांचे कल्याणराव उभेदळ यांनी स्वागत केले.माजी उपसरपंच विठ्ठलराव पाषाण यांनी प्रास्ताविक केले.उपस्थित संत महंतांचे संतपूजन व उपस्थित मान्यवर मंडळी अन्नदान करणाऱ्या दात्यांचा सोहळा कमिटीच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी हंडीनिमगावचे सरपंच भिवाजीराव आघाव,उद्योजक करमचंद पटेल, जेऊर येथील अशोकराव नवले,भाकचंद पाडळे,जिजाबा उभेदळ,शिवाजी वाळके,मोहन सावंत, भीमा चव्हाण, बबनराव शेटे,बाळासाहेब उभेदळ,खंडू निकाळजे, भाऊसाहेब भोसले,भगवान दळवी,अशोक खंडागळे,हर्षद पाटील,प्रकाश नवले,राजमुद्रा तरुण मंडळाच्या सदस्यांसह महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते त्रिदिनात्मक सोहळयामध्ये पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील अठराव्या अध्यायाचे पारायण,सायंकाळी ५ ते ६ सामूहिक हरिपाठ, रात्री ७ ते ९ किर्तन असे कार्यक्रम होणार आहे. त्रिदिनात्मक सोहळयात होणाऱ्या पारायणाचा व किर्तन श्रवणाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सोहळा कमिटी व राजमुद्रा तरुण मंडळ व सुरेशनगर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

# नवीन आर्थिक वर्षात रेडी रेकनर दर स्थिर

मुंबई: (स. गांवकरी)

महायुती सरकारने नवीन आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे बांधकाम क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालयामार्फत १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारे हे दर मागील वर्षाप्रमाणेच (२०२५-२६) 'जैसे थे' ठेवण्यात आले आहेत. मागील काही वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, रेडी रेकनरच्या दरात सातत्याने चढ-उतार पाहायला मिळाले होते. २०१७-१८ ला सरासरी ५.८६% वाढ झाली होती. २०२०-२१ ला कोरोना संकटामुळे केवळ १.७४% इतकी माफक वाढ करण्यात आली होती.

# शासकीय व निमशासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांची क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न

ठाणे: (स. गांवकरी)



शासकीय व निमशासकीय कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता. संपूर्ण स्पर्धा एकाच दिवसात ठाणे सेंट्रल मैदान येथे यशस्वीरित्या पार पडली. सर्व संघांनी अत्यंत खेळाडूवृत्ती, शिस्तबद्धता आणि उत्साहाने सामने खेळले. प्रत्येक सामना रोमांचक ठरला असून खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी सादर केली. या स्पर्धेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शारीरिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे होय.

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये ताणतणाव वाढत असताना, अशा क्रीडा स्पर्धांमुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होते. स्पर्धेचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आयोजन अत्यंत उत्तम प्रकारे करण्यात आले होते. आयोजकांच्या मेहनतीमुळे संपूर्ण स्पर्धा सुरळीत आणि यशस्वीरीत्या पार पडली. या उपक्रमामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये एकोपा, मैत्रीभाव आणि क्रीडास्पर्धेची भावना अधिक दृढ झाली. सहभागी खेळाडू आणि उपस्थित प्रेक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. ठाणे कॉप्स फायनल विजेता संघ हा विजेता ठरला प्रसंगी विजेता व उपविजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# पेपर कपवर वापरणाऱ्या हॉटेल व टपरीवर होणार कारवाई

ठाणे: (स. गांवकरी)




ठाण्यात पेपर कपवर वापरणाऱ्या हॉटेल व चहा टपरीवर दंडात्मक कारवाई करण्याचे ठाणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने आदेश काढले आहे. पत्रकार विशाल कुरकुटे यांच्या तक्रारीनंतर ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभाग समित्यांच्या सहायक आयुक्तांना परिपत्रकाद्वारे हॉटेल्स व चहा स्टॉल्सवर दंडात्मक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. ठाणे महानगरपालिका यांनी शहरातील हॉटेल्स व चहा स्टॉल्समध्ये चहा पिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेपर कपविरोधात कारवाईचा इशारा दिला आहे. पत्रकार विशाल कुरकुटे यांनी केलेल्या तक्रारीनंतर महापालिकेने याची गंभीर दखल घेतली आहे. शहरातील अनेक ठिकाणी चहा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पेपर कपचा वापर होत असून, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. अशा कपमधील रसायनांमुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा मुद्दा अत्यंत गंभीर मानला जात आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व हॉटेल्स व चहा स्टॉल्सवर कारवाई करून दंड आकारला जाणार आहे.

# वरखेड यात्रेच्या पार्श्वभूमीवर नियोजन बैठक संपन्न

## लक्ष्मीआई वरखेडची यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी दक्षता घेऊ : आमदार विठ्ठलराव लंघे पाटील

नेवासा: (समर्थ गांवकरी)



नेवासा तालुक्यातील वरखेड येथे दि.७ एप्रिल रोजी होणाऱ्या लक्ष्मी आईच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध खात्याच्या अधिकाऱ्यांच्या समवेत नियोजन बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लक्ष्मी आई वरखेडची यात्रा उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी दक्षता घेऊ,भाविकांना सुविधा योग्य पद्धतीने कशा उपलब्ध होतील यासाठी प्रशासकीय पातळीवर अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा असे आवाहन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी यावेळी बोलतांना केले. यावेळी झालेल्या नियोजन बैठकीच्या प्रसंगी तहसीलदार डॉ.संजय बिरादार,गटविकास अधिकारी संजय लखवाल,पोलीस निरीक्षक महेश पाटील,दलित बहुजन चळवळीतील नेते सुधीर वैरागर,देवस्थानचे अध्यक्ष कडूबाळ गोरे पाटील,उपाध्यक्ष लक्षाधीश दाणे माजी जिल्हा परिषद सदस्य पुरुषोत्तम सर्जे,सरपंच विनोद ढोकणे,पोपटराव सरोदे,पोलीस पाटील संतोष घुंगासे, विजय शिरसाठ यांच्यासह विविध खात्याचे अधिकारी, देवस्थानचे सर्व विश्वस्त,ग्रामस्थ गावातील तरुण मंडळाचे पदाधिकारी बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आलेल्या अधिकारी पदाधिकारी विविध क्षेत्रातील मान्यवरांचे देवस्थानचे अध्यक्ष कडूबाळ गोरे पाटील यांनी स्वागत केले.तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांनी प्रास्ताविक करतांना प्रशासकीय पातळीवर विविध सुविधा भाविकांना उपलब्ध होण्यासाठी प्रशासन सतर्क असल्याचे सांगितले. यात्रेच्या नियोजन कामी नेवासा तालुक्यातील सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांना यात्रा काळात सतर्कतेचे आदेश दिले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या नियोजन बैठकीमध्ये बोलतांना आमदार विठ्ठलराव लंघे पाटील म्हणाले की दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या दृष्टीने वरखेड-शिरसगाव हा रस्ता मंजूर केला असून यात्रेकरिता सर्व प्रशासकीय यंत्रणांनी आपआपली जबाबदारी व कर्तव्य चोखपणे बजावण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. नियोजित बैठकीचे समन्वयक सुधीर नाथा वैरागर म्हणाले की महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या लक्ष्मी आई वरखेड यात्रा या नावाला जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती दिली त्यानुसार लक्ष्मी आई वरखेड हे नाव पुढील काळात कायम राहील असे सांगितले. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी व यात्रेतील भाविकांना सुविधेची कमतरता भासणार नाही यासाठी प्रशासनासह मंदिर व्यवस्थापनाने प्रयत्न करावा असे आवाहन केले

नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी यात्रेच्या परीसराची आपण पोलीस यंत्रणेसह प्रत्यक्ष पाहणी केली असुन यात्रा काळात अवैध धंदे कारवाई केली जाईल तसेच दादागिरी दहशत खपवुन घेतली जाणार नाही त्यासाठी कडक कारवाई केली जाईल असा ईशारा यावेळी बोलतांना दिला लक्ष्मी आई वरखेड यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी लक्ष्मीआई मंदिरासह परिसरात एकूण १६ सीसीटीव्ही कॅमेरे तैनात करण्यात आले असल्याने मंदिर प्रांगणात गैरप्रकार करणाऱ्यांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर असणार असल्याची माहिती कडूबाळ गोरे पाटील यांनी यावेळी बोलतांना दिली. यावेळी झालेल्या बैठक प्रसंगी संजय वाल्हेकर, नामदेव चांदणे,सुरेश आढागळे, शंकर भारस्कर,सुनिल वाघमारे,रामभाऊ केंदळे,रामभाऊ कणगरे, सरपंच विनोद ढोकणे आदींची भाषणे झाली.

# 'महावीर की रोटी' उपक्रमाचा दिमाखात शुभारंभ



**राजगुरुनगर : (स. गांवकरी)**

भगवान महावीर जन्म कल्याणक दिनाचे औचित्य साधून राजगुरुनगर येथे "महावीर की रोटी" या नवीन सामाजिक उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात सुरू करण्यात आला.

राजगुरुनगर नगर परिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेशजी गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहरजी सांडभोर तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविका यांच्या हस्ते महावीर की रोटी या रोटी संकलन च्या गाडीचे लोकार्पण करण्यात आला.

येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, भारतमाता पूज्य प्रमोदसुधाजी म.सा. चॅरिटेबल ट्रस्ट आणि नवकार ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने 'जीवदया' आणि 'गोसेवा' या संकल्पनेवर आधारित "महावीर की रोटी" हा उपक्रम"एक रोटी गोमाता के नाम, यही अपना पहला काम" या ब्रीदवाक्यासह हा उपक्रम राबवला जाणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शहरातील प्रत्येक घरातून गोमातेसाठी किमान एक रोटी संकलित करून ती गोशाळेतील गायींना अर्पण करणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत दर रविवारी संस्थेची एक विशेष गाडी शहरातील विविध भागांत फिरणार आहे. ही गाडी नागरिकांच्या घरापर्यंत येईल. नागरिकांनी आपल्या घरातील ताजी रोटी/चपाती या गाडीतील

## गोसेवेसाठी सरसावले सकल जैन संघ

"रोटीपात्र" मध्ये दान करायची आहे. संकलित झालेली रोटी गोशाळेतील गोमातेच्या चरणी अर्पण केली जातील. राजगुरुनगरमधील नागरिकांनी या पवित्र कार्यात सहभागी होऊन 'जीवदया' आणि 'पुण्य' पदरी पाडून घ्यावे, असे आवाहन नगराध्यक्ष मंगेशजी गुंडाळ, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अजयजी बलदोटा, जैन धर्मार्थ हॉस्पीटलचे अध्यक्ष संतोषजी बोथरा व नवकार ग्रुप चे अध्यक्ष अमरजी टाटीया यांच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी नगरसेवक वैभव घुमटकर, फैज मोमीन, निलेश घुमटकर, कुमार सांडभोर, सागर सातकर, सचिन मधवे, नगरसेविका सुप्रिया घुमटकर, सुप्रिया पिंगळे, ज्योती वाडेकर, कल्पना आढारी, आशा गुंडाळ, मा. अध्यक्ष विजुशेठ भन्साळी, फुलाशेठ ओसवाल, संतोष बोथरा, प्रशांत कर्नावट, मनोज कासवा, संतोष कासवा, सुरेश पोखर्णा, अमर टाटीया, नितीन शहा, नितेश ओसवाल, कमलेश पोखर्णा आदी जैन सकल संघाचे सदस्य उपस्थित होते.

# रक्तदान शिबिर व महाप्रसाद उत्साहात संपन्न



**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**

तरोडा नाका व्यापारी मित्र परिवारातर्फे श्रीराम नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबिर व महाप्रसाद कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडले. या कार्यक्रमास परिसरातील व्यापारी बांधव तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. तसेच महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठीही नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली. संपूर्ण कार्यक्रमामध्ये शिस्तबद्ध नियोजन आणि सर्वांच्या सहकार्यामुळे एक आदर्श वातावरण निर्माण झाले होते. या यशस्वी उपक्रमासाठी तरोडा नाका परिसरातील सर्व व्यापारी बांधवांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या एकजुटीमुळेच हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडता आला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. भविष्यात यापेक्षाही अधिक मोठे आणि भव्य सामाजिक व धार्मिक उपक्रम आयोजित करण्यासाठी या कार्यक्रमातून प्रेरणा व बळ मिळेल. या शिबिरास अर्पण रक्तपेढीचे संचालक मा. मॉन्टीसिंग जहागीरदार, संचालक श्री सुदर्शन अदमनकर, संचालक कृष्णा भुसेवाड सर संचालक वैभव गोरे सर, प्रियंका तांबारे, राहुल पाटील, विक्की डक, स्वाती ठोंबरे व सर्व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी अथक परिश्रम घेतले व या रक्तदान शिबिरास उपस्थित होते.

# ३,४६९ कोटींचे महापालिका अंदाजपत्रक सादर



## करवाढ नाही; विकासकामांना गती देण्याचा संकल्प

**नाशिक : (स. गांवकरी)**

नाशिक महापालिकेच्या अंदाजपत्रकात सन २०२६-२७ साठी आयुक्त मनीषा खत्री यांनी सादर केलेल्या ३,०११.८५ कोटींच्या स्थायी समितीने ४५७.२८ कोटींची वाढ सुचवून स्थायी सभापती मच्छिंद्र सानप यांनी ३,४६९ कोटींचे अंदाजपत्रक सोमवारी (दि. ३०) महासभेला सादर केले. नागरिकांवर करवाढ न करता विकासकामांना गती देण्याचा संकल्प यामध्ये मांडण्यात आला. महापौर हिमगौरी आहेर आडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अंदाजपत्रक सादर झाले. मूळ अंदाजपत्रकावर स्थायी समितीत चर्चा होऊन महसुली उत्पन्नवाढीवर भर देण्यात आला. स्थायी समितीने सुमारे ३०० कोटींची विकासकामे वाढवली; मात्र त्यासाठी निधी अपुरा असल्याने एक टक्का मुद्रांक शुल्कातून सुमारे ३०० कोटी मिळण्याची अपेक्षा आहे. ही रक्कम न मिळाल्यास अंदाजपत्रकावर ताण येऊ शकतो. प्रशासनाने २,५४१ कोटी उत्पन्न दर्शवले असून ७३७ कोटी भांडवली व २,२७३ कोटी महसुली खर्चाची तरतूद आहे. प्रभाग विकास निधी सुमारे ३०० कोटींपर्यंत वाढविण्यात येणार आहे. घरपट्टी थकबाकी, विकास शुल्क, नवीन वसाहतींवरील कर आणि शासनाकडील निधी वसुलीवर भर देण्यात येणार आहे. रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वीज व उद्यान विकासासह प्रभागनिहाय कामांना प्राधान्य देण्यात आले आहे.

# नागरिक प्रश्नांवर तोडगा काढा

**नागपूर : (स. गांवकरी)**

वेकोली प्रकल्पामुळे प्रभावित नागरिकांच्या प्रश्नांबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांची दिल्लीत जाऊन भेट घेतली. वेकोलीच्या प्रकल्पांमुळे बाधित शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याची मागणी यावेळी बावनकुळे यांनी केली. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत वेकोलि संचालक मंडळासोबत काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली होती. मात्र, संचालक मंडळाने कोणत्याही महत्त्वाच्या मुद्द्यावर पावले उचललेली नाही. त्यामुळे प्रभावित नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून, प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, असे बावनकुळे यांनी केंद्रीय कोळसा मंत्र्यांना सांगितले.

# पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ३२ लाख रुपये नफा

## आ. काशिनाथ दाते सर

**पारनेर : (स. गांवकरी)**

मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ पारनेर ग्रामीण पतसंस्थेला सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षात रुपये ५ कोटी ३२ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली. संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर २५१ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे खेळते भांडवल २९५ कोटी ५२ लाख असुन वसूल भाग भांडवल ६ कोटी ५४ लाख, राखीव व इतर निधी २९ कोटी ८३ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप १७५ कोटी २९ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये १०६ कोटी ९९ लाख आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये २४८० कोटींची झालेली आहे.



संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे (नवी मुंबई) खडकवाडी, आळेफाटा, सुपा व शिरूर येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अध्यावत इमारती आहेत. पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा ता. जुन्नर, सुपा, कामोठे (नवी मुंबई), वनकुटे, अहिल्यानगर, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई आहे. संस्थेमार्फत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, जामगाव, ढवळपुरी व बेलवंडी फाटा येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थेच्या अद्यावत कोर बँकिंग, मोबाईल बँकिंग, एस एम एस सुविधांमुळे ग्राहकांना सर्व माहिती तात्काळ मिळत आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरक कंपनीचे अधिकृत वीज बिल भरणा केंद्र, आर.टी.जी.एस व एन.ई.एफ.टी सुविधा सुरू करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांनी सांगितले.

> संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत सभासदांच्या विश्वासावर प्रगती केलेली असून, सभासदांना घर बांधणी, व्यवसाय, स्थावर मालमत्ता खरेदीसाठी, वाहन खरेदी तसेच गोरगरीब गरजू घटक, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, लघुउद्योग, होतकरू कामगारांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती करता यावी यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.
>
> **- सुरेश बोरुडे सर, व्हा. चेअरमन पारनेर ग्रामीण पतसंस्था पारनेर**

# वासुर्णा येथे 'धन्वंतरी आरोग्य चिंतन शिबिर' उत्साहात संपन्न

**डांग, गुजरात : (स. गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील वासुर्णा गावातील वासुरणा संस्कृती धाम येथे त्रिदिवसीय "धन्वंतरी आरोग्य चिंतन शिबिर" उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. तेजस्विनी संस्कृती परिवार आणि धन्वंतरी आरोग्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चैत्र महिन्यात आयोजित या शिबिरात राज्यभरातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या शिबिरात आयुर्वेद, होमिओपॅथी, फार्मास्युटिकल आणि फिजिओथेरपी क्षेत्रातील डॉक्टर, शिक्षक तसेच उद्योजक कुटुंबासह सहभागी झाले होते. तीन दिवसांच्या कालावधीत योग, ध्यान, आयुर्वेदिक जीवनशैली, अध्यात्म आणि ट्रेकिंग अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ट्रेकिंगदरम्यान सहभागींकडून स्थानिक औषधी वनस्पतींचे निरीक्षण व अभ्यासही करण्यात आला.



शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य सुधारण्यासाठी विविध उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सामाजिक समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सखोल चर्चा झाली. जीवनातील बालपण, तरुणपण आणि वृद्धावस्था या टप्प्यांमध्ये आहार, विहार, विचार, व्यवहार आणि अग्निहोत्र यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. बालसंस्कारासाठी बालगीते आणि सनातन संस्कृतीवरही विशेष चिंतन करण्यात आले.

या शिबिराचे मुख्य आयोजक व प्रेरणास्थान डॉ. नाकराणी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ब्रह्मवादिनी पूज्य हेतलदीदी, गौतमभाई सखीया आणि डॉ. भारतीबेन यांनी मार्गदर्शन केले. याशिवाय आचार्य डॉ. केतनदादा, चेतनाबेन, जयलक्ष्मीबेन आणि धनसुखभाई यांनी गावातील आदिवासी मुलींचे कन्यापूजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपेशभाई यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या यशासाठी चित्राबेन, ओमभाई, डॉ. रुनालीबेन, सुरेशभाई आणि धनसुखभाई यांचे मोलाचे योगदान लाभले.

हे त्रिदिवसीय शिबिर आरोग्य, संस्कृती आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवणारे ठरले असून समाजात जागरूकता निर्माण करणारा प्रेरणादायी उपक्रम म्हणून याची नोंद घेण्यात येत आहे.

# महिलेचा हृदय विकाराने मृत्यू

**कामठी : (स. गांवकरी)**

न्यू येरखेडा येथे दोन कुटुंबांत घरासमोरून जाण्यावरून शाब्दिक वाद विकोपाला गेला. त्यानंतर त्रिशिला मुकेश खोब्रागडे (४७, रा. साईकृपा सोसायटी) हृदयविकाराने मृत्यू झाला. भांडण करणाऱ्या शेजारी दाम्पत्यावर कारवाई करण्याची मागणी मृताच्या नातेवाइकांनी केली आहे. नवीन कामठी पोलिस ठाण्यातील अंमलदार सपना राहुल माटे (४०) व त्यांचे पती राहुल रंगारी हे दोघेही पोलिस विभागात कार्यरत आहेत. त्यांच्या शेजारी एअर फोर्स आमला मध्य प्रदेश येथे कार्य करणारे मुकेश खोब्रागडे यांची पत्नी त्रिशीला व दोन मुली राहतात. रविवारी (दि. २९) रात्री आठ वाजता सुमारास सपना माटे घरी आल्या. त्रिशिला खोब्रागडे यांनी घरासमोर सिमेंट ओटा बांधल्याने वाहन नेताना अडचण निर्माण होत असल्या कारणाने दोन्ही कुटुंबात शाब्दिक वाद निर्माण झाला.

# बाजरी फुलोऱ्यात अवकाळी पावसामुळे चिंता

**ओतूर : (स. गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर व परिसरातील गावांमध्ये सध्या बाजरीचे पिक फुलोऱ्यात आले आहे. परंतु सध्या हवामानाच्या लहरीपाण्यामुळे बाजरीचे पीक धोक्यात आले आहे.

उन्हाळ्यात हमखास उत्पन्न देणारे पीक म्हणून बाजरी या पिकाकडे पाहिले जाते. त्यामुळे दिवसेंदिवस उन्हाळी बाजरी पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. ओतूर, धोलवड, हिवरे, खामुंडी, डुंबरवाडी, उदापूर, ठिकेकरवाडी आदी गावांमध्ये बाजरीचे पिक जोमात आले आहे. परंतु सोमवारी दुपारी झालेल्या अवकाळी पावसामुळे व पुढील काही दिवसात हवामान अंदाजानुसार होणाऱ्या अवकाळी पावसामुळे पीक धोक्यात येण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत असून हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातोय की काय अशी भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. पेरणीनंतर साधारण ५०-५५ दिवसांनी ही अवस्था येते. जिथे पिकाला भरपूर सूर्यप्रकाश व ओलावा आवश्यक असतो. योग्य काळजी घेतल्यास या अवस्थेत शेतकरी चांगल्या उत्पादनाची अपेक्षा करू शकतात. बाजरी फुलोरा अवस्थेत तापमान ४२ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त असल्यास परागकण मरतात, ज्यामुळे उत्पादनात घट होऊ शकते. हे पीक प्रामुख्याने जनावरांच्या चाऱ्याचा आणि अन्नाचा प्रश्न सोडवते, म्हणून या कालावधीत योग्य लक्ष दिल्यास या पिकाचा चांगला फायदा होतो असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले.



# सहयोग प्रतिष्ठान व आवारे परिवारातर्फे हनुमान चालीसाचे आयोजन



## जय श्रीरामाच्या जयघोषाने सारसनगर दुमदुमले

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

येथील सारस नगर मधील सहयोग प्रतिष्टान व आवारे परिवारातर्फे हनुमान चालीसाचे आयोजन करण्यात आले होते. दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ ,सर्जेपुरा तर्फे हनुमान चालीसा पाठ या भक्ती संध्या कार्यक्रमात सामुदायिक हनुमान चालीसा पठण करण्यात आले यावेळी व्यासपीठावर प्रभू श्रीरामाचा व श्री हनुमानाची फोटोची आकर्षक सजावट करण्यात आली होती. या भजनसंध्या कार्यक्रमात रामजी की निकली सवारी,बोल बजरंग बली की जय,श्री स्वामी समर्थ जय जय,आई भवानी तुझ्या कृपेने तारसी भक्ताला या भक्तिमय गाण्यांनी सर्व परिसर दुमदुमला.यानंतर श्रीरामाचा जप करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रभू श्रीरामाची व हनुमानाची महाआरती करण्यात आली. यावेळी नगर शहर व परिसरातून रामभक्तांची मोठी गर्दी केली होती.

# महावीर जयंती उत्साहात साजरी; रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

भगवान महावीर जन्मकल्याणक दिन (महावीर जयंती) निमित्त राजगुरुनगर शहरात विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत १३९ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जोपासली.

या शिबिराचे आयोजन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, भारतमाता पूज्य प्रमोदसुधाजी म. सा. चॅरिटेबल ट्रस्ट व नवकार ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. यावेळी प्रत्येक रक्तदात्याला आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.



तत्पूर्वी जैन सकल संघातर्फे शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेमधे गरबा खेळून भगवान महावीर जन्मकल्याणक दिनाचे स्वागत करण्यात आले. महावीर भवन मध्ये भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित आनंद पाठशाळेतील मुलांचे नाटक सादर करण्यात आले. जागृती महिला मंडळाच्या वतीने प्रसाद म्हणून लापशीचे चे वाटप करण्यात आले. त्यानंतर अरिहंत नागरी पतसंस्थेच्या वतीने सर्वांसाठी 'गौतमप्रसादाचे' (महाप्रसाद) आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी राजगुरुनगर नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेशदादा गुंडाळ, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अजय बलदोटा, श्री मुनीसुव्रत स्वामी मंदीर ट्रस्टचे अध्यक्ष संजय राठोड, भारतमाता पूज्य प्रमोदसुधाजी म. सा. चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष संतोष बोथरा, अरिहंत नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष सुशील शिंगवी, मा. अध्यक्ष विजय भन्साळी, लालचंद कर्नावट, फुलाशेठ ओसवाल, प्रकाश गदिया, अजित लुणावत, माजी सरपंच प्रदीप कासवा यांच्यासह नगरसेवक वैभव घुमटकर, फैज मोमीन, निलेश घुमटकर, कुमार सांडभोर, सागर सातकर, सचिन मधवे, नगरसेविका सुप्रिया घुमटकर, सुप्रिया पिंगळे, ज्योती वाडेकर, कल्पना आढारी, आशा गुंडाळ, आदी जैन सकल संघाचे सदस्य उपस्थित होते.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी नवकार ग्रुप चे अध्यक्ष अमर टाटिया, प्रशांत कर्नावट, चंदन खारीवाल, सागर बलदोटा, अजय बलदोटा, नीलम मुथा, कमलेश पोखर्णा, सौरभ लुणावत, सतीश गांधी, राज भन्साळी, प्रतीक रुणवाल, मनोज कासवा, नितेश ओसवाल यांच्यासह जैन सकल संघाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. चाकण ब्लड बँकेचे आकाश जगताप यांचे याकामी मोलाचे सहकार्य लाभले.

जीवदया' आणि 'गोसेवा' या संकल्पनेवर आधारित "महावीर की रोटी" या नवीन सामाजिक उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. उपक्रमाचा मुख्य उद्देश शहरातील प्रत्येक घरातून गोमातेसाठी किमान एक रोटी संकलित करून ती गोशाळेतील गायींना अर्पण करणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत दर रविवारी संस्थेची एक विशेष गाडी शहरातील विविध भागांत फिरणार आहे. ही गाडी नागरिकांच्या घरापर्यंत येईल. नागरिकांनी आपल्या घरातील ताजी रोटी/चपाती या गाडीतील "रोटीपात्र" मध्ये दान करायची आहे. संकलित झालेली रोटी गोशाळेतील गोमातेच्या चरणी अर्पण केली जातील.

या सामाजिक उपक्रमाचा शुभारंभ लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेशदादा गुंडाळ तसेच सर्व नगरसेवक यांच्या हस्ते करण्यात आला. सदर उपक्रमाला राजगुरुनगरकरांनी प्रतिसाद द्यावा असे आवाहन देखील त्यांनी केले.

# संचालकपदी एकनाथराव आळेकर यांची निवड

**श्रीगोंदा : (स. गांवकरी)**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी श्रीगोंदा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन व संचालक बाबासाहेब भोस यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदारसंघ क्रमांक १, श्रीगोंदा गट क्रमांक १ मधील एक जागा रिक्त झाली होती. या नैमित्तिक रिक्त जागेसाठी मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेनंतर निवड प्रक्रिया पार पडली.




दि. ३० मार्च रोजी कारखाना कार्यस्थळावर संजय गोंदे (अध्यासी अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक, साखर, अहिल्यानगर) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत एकनाथराव आळेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या नावाचा प्रस्ताव संचालक लक्ष्मणराव रायकर यांनी मांडला, तर श्रीनिवास घाडगे यांनी त्यास अनुमोदन दिले.

एकनाथराव आळेकर यांनी श्रीगोंदा नगरपालिका तसेच इंदिरा गांधी नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सामाजिक व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. स्वर्गीय शिवाजीराव बापू नागवडे यांचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणूनही त्यांची ओळख आहे.

त्यांच्या निवडीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे, व्हा. चेअरमन सौ. मेघाताई औटी, संचालक मंडळ सदस्य, तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, दूध संघाचे चेअरमन दिलीप वागस्कर आदी मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



ठाणे : दिवा शहरात महावीर जयंती निमित्ताने जैन बांधवाकडून भव्य रॅली काढण्यात आली. प्रसंगी दिवा शहरात राहणारे जैन बांधव एकत्र येऊन शहरातील जैन मंदिर ते आगासन रोड - ग्लोबल शाळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान मोठ्या उत्साहात रॅली काढून महाविर जयंती साजरी करण्यात आली प्रसंगी दिवा पोलीसांचे सहकार्य लाभले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### लग्नसमारंभामध्ये पाहुण्यांची तारांबळ, लाखो रुपयांचे नुकसान

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : कुसुर (तलाखी)ता:-जुन्नर येथे मोधे आणि पारधी परिवाराचा लग्न सोहळा संपन्न होत असताना अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचे आगमन झाले आणि लग्नाला आलेल्या सर्व पाहुण्यांची तारांबळ झाली.त्याचप्रमाणे मंडपवाले माधव दुधवडे यांचे मंडप आणि साऊंड सिस्टिम आणि डेकोरेशन च्या साहित्याचे लाखो रुपयाचे नुकसान झाले. लग्न सोहळ्याच्या दिवशी सकाळी साखरपुडा व टीळ्याचा कार्यक्रम अतिशय व्यवस्थित संपन्न झाला त्यानंतर भोजन समारंभ देखील संपन्न झाला परंतु लग्नाच्या टाइमिंग च्या अगोदर अर्धा तास अचानक आलेल्या या अवकाळी पावसाने उपस्थित सर्व पाहुण्यांची तारांबळ उडाली व मंडप साउंड सिस्टिम आणि डेकोरेशनचे साहित्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

### कचरा केल्यास दंड; कोळगाव ग्रामपंचायतीची धडाकेबाज मोहीम

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथे "स्वच्छ गाव, सुंदर गाव" या ध्येयाने ग्रामपंचायतीने कडक पावले उचलत प्लास्टिक बंदी व कचरा दंड मोहिमेला जोरदार सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ही कारवाई राबविण्यात येत आहे. गावात प्लास्टिकचा वापर व कचरा करणाऱ्यांवर थेट कारवाई करत २० व्यापारी व ग्रामस्थांकडून एकूण २,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ग्रामसभेच्या ठरावानुसार महिलांबाबत अपशब्द वापरणाऱ्या ३ ग्रामस्थांकडून १,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला, ज्यामुळे सामाजिक शिस्तीबाबतही कडक संदेश देण्यात आला. या मोहिमेत लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम यशवंत लगड, उपसरपंच विलास बाळासाहेब शितोळे, सदस्य नंदू काका लगड, निखील लगड, ग्रामपंचायत अधिकारी कवडे एस. एस. तसेच सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. सरपंच पुरुषोत्तम लगड यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "प्लास्टिकचा वापर टाळा आणि गाव स्वच्छ ठेवा, अन्यथा दंडाची कारवाई अटळ आहे." ग्रामपंचायतीच्या या धडाकेबाज कारवाईमुळे गावात खळबळ उडाली असून स्वच्छतेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत आहे. पुढील काळात ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.

### शिवसेना युवासेनेचा दौरा; सुशीलकुमार शिंदे यांची जिल्हा समन्वयकपदी निवड

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक येथे युवासेना कार्याध्यक्ष श्री. पूर्वेशजी प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली तसेच युवासेना सचिव श्री. किरण दादा साळी व उत्तर विभाग सचिव श्री. अविष्कार दादा भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षाच्या उत्तर महाराष्ट्र युवा संघटन दौरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्हा प्रमुख व मार्गदर्शक श्री. अभिषेकराजे भोसले यांच्या सहकार्याने ॲड. सुशीलकुमार गुलाबराव शिंदे (श्रीगोंदा) यांची अहिल्यानगर जिल्हा शिवसेना युवासेनेच्या जिल्हा समन्वयकपदी निवड करण्यात आली. यावेळी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख श्री. हेमंत लोखंडे, श्रीगोंदा तालुका प्रमुख श्री. निलेश गोरे तसेच तालुका संघटक श्री. प्रतीक बोरकर उपस्थित होते. या निवडीबद्दल शिवसैनिक व कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, पुढील काळात जिल्ह्यात युवासेनेचे संघटन अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी ॲड. सुशीलकुमार शिंदे कटिबद्ध राहतील, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### पहिले खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालय परिक्रमा शैक्षणिक संकुलात सुरू

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील मा. नामदार श्री. बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचलित परिक्रमा शैक्षणिक संस्थेला शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून राज्यातील पहिले खाजगी पशुवैद्यकीय (BVSc & AH) महाविद्यालय सुरू करण्यास केंद्र सरकारकडून मान्यता मिळाली आहे, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते यांनी दिली. हे महाविद्यालय महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूर यांच्याशी संलग्न असणार असून, आवश्यक असलेले विद्यापीठाचे संलग्नता पत्र, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) तसेच केंद्र सरकारकडून परवानगीपत्र (LOP) प्राप्त झाले आहे. तसेच भारतीय पशुवैद्यकीय परिषद (VCI) यांची मान्यताही मिळालेली आहे. महाविद्यालयात दरवर्षी ८० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. महाविद्यालय सुरू करण्यापूर्वी संस्थेच्या प्रतिनिधींनी देश-विदेशातील विविध खाजगी व सरकारी महाविद्यालयांना भेटी देऊन आवश्यक माहिती संकलित केली आहे. विद्यार्थ्यांसाठी अनुभवी शिक्षकवर्ग, प्रशस्त व स्वतंत्र इमारत, सुसज्ज ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, पशुचिकित्सा दवाखाना, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, खेळाचे मैदान तसेच बस सुविधा अशा आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# परदेशी तज्ञांची छत्रपतीच्या विद्यार्थ्यांसोबत सहकार्य संवाद

**जुन्नर तालुका : (स. गांवकरी)**

विद्यार्थी सहकार्य संवाद उपक्रम विरिज युनिव्हर्सिटी नेदरलँड,आणि एमआयटी वर्ल्ड पीसी युनिव्हर्सिटी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र विभाग आयोजित श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर येथे एक दिवशीय उपक्रम संपन्न झाला जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवार दि:-२७ मार्च रोजी विद्यार्थी सहकार्य संवाद उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमासाठी Vrije Universiteit Amsterdam, Netherland आणि MIT World Peace University, Pune या सह-निर्मिती संशोधन संस्था विद्यावाचास्तापतीकरणारे संशोधक विद्यार्थी उपस्थित होते या उपक्रमात Vrije Universiteit Amsterdam या नेदरलँड्स देशातील विद्यापी ठाचे वरिष्ठ प्राध्यापक प्रा.जोस्के बुन्डेर्स या सोबतच त्यांचेविद्यार्थी पुक क्वांट,जोसेफिन,अरीना ग्रीपा हे विद्यार्थी भारतात संशोधन कार्यासाठी आले होते. यासोबतच MIT World Peace University, Pune या विद्यापीठाचे प्रा.नितीन शर्मा हे या उपक्रमात सहभागी होते.



या उपक्रमातून व्रिजे विद्यापीठा तील प्राध्यापकांनी महाविद्याल यातील विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठीचा तथ्य संकलन, संशोधनाचे महत्व व दोन्ही-देशांतील सहकार्य, भारतीय समाज तसेच अनेक विषयांवर आपले मत मांडले.यासोबतच विद्यार्थी सहकार्य संवादाच्या माध्यमातून व्रिजे विद्यापीठातील संशोधन विद्यार्थ्यांनी महाविद्या लयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधाला. या संवादातून दोन्ही देशांतील विद्यार्थ्यांमध्ये विचारांचे आदान प्रदान झाले.विद्यार्थ्यांनी गट चर्चा करण्यात केली. यासोबतच द्विभाषिक अनुवादक म्हणून शुभम सूर्यवंशी उपस्थित होते. तसेच डॉ.गोपीनाथ,सत्यवान गागरे आणि जुन्नर तालुका पर्यटन प्रमुख यश मस्करे हे ही उपस्थित होते.या कार्यक्रमा साठी संस्थेचे अध्यक्ष ॲड.संजय शिवाजीराव काळे,अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.विलास कुलकर्णी यांनी शुभेच्छा देऊन कौतूक केले. महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाघमारे,उपप्राचार्य रविंद्र चौधरी आदींनी कार्यक्रमा स शुभेच्छा दिल्या.राज्यशास्र विभागप्रमुख प्रा. डॉ.अभिजित पाटील,प्रा.कुणाल वानखेडे, प्रा.शुभम कडू, प्रा. रेश्मा विधाटे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.रंजना पुराणे आणि विद्यार्थी समीक्षा ढोबळे यांनी केले.

# थोरांदळे येथे दरोड्यात खून प्रचंड खळबळ

**मंचर : (स. गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे गावात धक्कादायक घटना उघडकीस आली असून दरोड्याच्या उद्देशाने आलेल्या अज्ञात चोरट्यांनी एका वृद्धाचा निर्घृण खून केल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, थोरांदळे येथील पाईन मळा परिसरात राहणारे दामोदर जयराम मिडे (वय ६२) हे घरात एकटेच झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी धारदार शस्त्राने त्यांच्या डोक्यावर वार करून त्यांची हत्या केली. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून,



चोरट्यांनी घरातील ऐवज लंपास केला आहे का याबाबत अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली असून लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास मंचर पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ व पोलीस सहकारी यांचे कडून व्यक्त करण्यात आला आहे.

# नंदकुमार कुरुमकर यांचे उल्लेखनीय योगदान

**श्रीगोंदा तालुका: (स. गांवकरी)**

शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करत श्री नंदकुमार कुरुमकर यांनी संस्था, विद्यालय आणि विद्यार्थ्यांसाठी भरीव योगदान दिले आहे, असे प्रतिपादन सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री राजेंद्र दादा नागवडे यांनी केले. लोणी व्यंकनाथ येथील व्यंकनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सेवक व पत्रकार श्री नंदकुमार कुरुमकर यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी महाराष्ट्र शिक्षकेतर सेवक महासंघाचे अध्यक्ष श्री वाल्मिक सुरासे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री कुरुमकर यांनी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेत तब्बल ३९ वर्षे सेवा बजावत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली. आपल्या मनोगतात त्यांनी लोकनेते स्वर्गीय बापूंच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, त्यांच्या प्रयत्नांमुळे तालुक्यात शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहोचली. याच संस्थेत शिक्षण घेऊन पुढे नोकरीची संधी मिळणे ही आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी शिदोरी असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष श्री वाल्मिक सुरासे यांनी कुरुमकर यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या संयमी व शांत स्वभावाचा विशेष उल्लेख केला. शिक्षकेतर सेवकांच्या निरोप समारंभासाठी एवढ्या मोठ्या संख्येने मान्यवर व नागरिक उपस्थित राहणे ही त्यांच्या कार्याची खरी पावती असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नागवडे कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन तथा ज्येष्ठ संचालक सुभाष काका शिंदे यांनीही कुरुमकर यांच्या प्रामाणिक सेवाभावाचा गौरव केला. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय राहून समाजाच्या समस्या मांडत राहाव्यात, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मिक सुरासे यांनी श्री नंदकुमार कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती जाहीर केली.

# लोहा शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, शादीखाना प्रश्न मार्गी लागणार

## आ प्रताप पाटील चिखलीकर यांचा पाठपुरावा



**लोहा : (स. गांवकरी)**

लोहा शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह व्हावे त्यासाठी शासकीय जागेची उपलब्ध ,तसेच मुस्लिम बांधवांच्या शादीखानाच्या जागेचा प्रश्न तात्काळ मार्गी लागावा यासाठी विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ प्रताप पाटील चिखलीकर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे .जिल्हाधिकारी यांच्याकडे शहर विकासाच्या अनुषंगाने महत्वाच्या विषयावर बैठक झाली त्यात शहरातील महत्वाचे प्रश्न मार्गी लागणार आहे .जागेचा प्रश्न लवकरच निकाली निघेल असा विश्वास बैठकी नंतर आ चिखलीकर यांनी व्यक्त केला विधिमंडळ उपविधीन समितीचे अध्यक्ष आ चिखलीकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले याच्याकडे बैठक पार पडली या बैठकीसाठी

जि प. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, सहाय्यक जिल्हाधिकारी कंधार उपविभागीय अधिकारी अनन्या रेड्डी आय.ए.एस

निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे लोहा उपनगराध्यक्ष करीम शेख, उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी (कंधार) , सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता राम गलधर, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, मुख्याधिकारी संदीप भोळे, ( कंधार) महावितरणचे कार्यकारी अभियंता चव्हाण, लघु पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम विभाग, भूमी अभिलेख, महावितरण, नगरपालिका संबधीत अधिकारी तसेच इमाम लदाफ ,मार्केट कमिटीचे संचालक अण्णासाहेब पवार . यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते सामाजिक न्याय विभागाच्या वतीने लोहा शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतीगृह उभारण्यात येणार आहे त्यासाठी जागा . तसेच मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना उभारण्यात येणार आहे त्याच्या जागेचा प्रश्न या बैठकीत निकाली काढण्यात आला त्यामुळे गेल्या निवडणुकीत आ प्रताप पाटील यांनी मुस्लिम बांधवांना दिलेल्या आश्वासनाची पुर्तता होणार आहे

माळेगाव यात्रा येथे सौर ऊर्जा प्रकल्प राबवण्यासाठी महावितरणचे ना हरकत तसेच . श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान यात्रा परिसर विकास प्रसाद योजने अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव व शिफारसी शासनास पाठवणे य विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आ प्रताप पाटील यांनी मतदार संघातील प्रसिद्ध खंडोबा यात्रा ज्या जागेत भरते .ती

जिल्हा परिषदेची जागा लोकलफंड या नावाने आहे. ती जागा जिल्हा परिषदेच्या नावाने करावी .यासह सह अनेक महत्वाच्या विषयावर बैठकीत सकारात्मक चर्चा झाली बैठकीत आ चिखलीकर व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित विभागप्रमुखांना तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात सूचना केल्या.त्यामुळे हे प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याचे दिसते.

# भारत विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

भारत विद्यालयाची गुणवत्ता ही मिरजगाव परिसरामध्ये आग्रक्रमाने ओळखली जाते ही गुणवत्तेची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे. असे प्रतिपादन विद्यालयाचे चेअरमन आणि हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी केले. विद्यालयामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.




याप्रसंगी अरिहंत पतसंस्थेचे चेअरमन पंकज धोंगडे,जिल्हा ग्रामीण आरोग्य केंद्र मिरजगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ.दराडे, उद्योजक संजय बगाडे, गणेश झरकर, शालेय समिती सदस्य सौ. अर्चना गोरे आदींसह पालक उपस्थित होते. मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा आदी मान्यवरांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आणि शाळेच्या भौतिक विकासाच्या दृष्टीने राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. भौतिक विकासाकरिता समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.त्याबरोबरच नवोदय विद्यालया मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्येही विद्यालयाचा विद्यार्थी निवडला गेला आहे. NMMS परीक्षेमध्ये एकूण १९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्ती करताना निवड झाली आहे. कु.पूर्वा वायाळ ही विद्यार्थिनी १४९ गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तर नवोदय विद्यालयाकरिता विद्यालयाचा कार्तिक शिंदे हा विद्यार्थी निवडला गेला आहे. या सर्वच विद्यार्थ्यांचा विद्यालया मार्फत पालकांच्या उपस्थिती मध्ये सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमाकरिता मोठ्या प्रमाणात पालक आणि मिरजगावचे ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल यांनी सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला आणि पुढील यशाकरता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बोलताना पंकज धोंगडे यांनी विद्यालयाच्या गुणवत्तेबाबत प्रगती बाबत समाधान व्यक्त केले. विद्यालयाच्या प्रगतीसाठी आपण सर्वतोपरी मदत करण्याचे मान्य केले.आपल्या मनोगतामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांच्या बक्षीसाकरिता ५१,००० रुपये कायम ठेव ठेवून यामधून स्पर्धा परीक्षांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना भरघोस बक्षीस देण्याचे जाहीर केले. त्याबरोबरच विद्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या सुशोभिकरणाचे काम लवकरच पूर्ण करण्याचे जाहीर केले. विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.ज्यामध्ये कार्तिक शिंदे ,अनुष्का गवारे ,साक्षी बाबर,पूर्व वायाळ यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल आणि शाळा राबवत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांसाठी आनंद व्यक्त केला.भविष्यामध्ये शाळेचे नाव असेच उज्वल करू अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# 'कप्तान'चा थरारक ट्रेलर प्रदर्शित




पुणे : (स. गांवकरी)

भारताची आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने आज आपल्या आगामी ‘कप्तान’ या सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित केला असून ही सीरिज 3 एप्रिलपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ज्वालाबादच्या तणावपूर्ण पार्श्वभूमीवर आधारित हे कथानक अशा जगात घेऊन जाते, जिथे गुन्हेगारी संघटित कार्टेल्सच्या स्वरूपात विकसित झाली आहे आणि केवळ अनागोंदी माजवून नव्हे तर नियंत्रण मिळवून सत्ता निर्माण होते. साकिब सलीम एसएसपी समरदीप ही 'कप्तान'ची भूमिका साकारत असून आपल्या वेगळ्या कार्यपद्धतीसाठी ओळखल्या जाणाऱ्या या अधिकाऱ्याभोवती कथा फिरते. या सीरिजमध्ये सिद्धार्थ निगम, कविता कौशिक, वरुण बडोला, अंजुम शर्मा, आरिफ झकारिया, पूजा गोर, विक्रम कोचर आणि अनुष्का कौशिक यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. जतीन वागळे दिग्दर्शित आणि बवेजा स्टुडिओजच्या बॅनरअंतर्गत पम्मी बवेजा आणि हरमन बवेजा निर्मित ‘कप्तान’ही सीरिज दमदार ॲक्शन, तीव्र भावना आणि सतत जाणवणाऱ्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही कथा सत्ता, महत्त्वाकांक्षा आणि सूड यांच्या रोमहर्षक संघर्षाला आकार देते. ट्रेलर केवळ वेगवेगळ्या गुन्हेगारी घटनांपुरता मर्यादित राहत नाही, तर बनावट व्यवहारांचे जाळे, संघटित रॅकेट्स आणि हळुहळू पेट घेत असलेला वर्चस्वाचा संघर्ष अशा व्यापक पातळीवर कथा उलगडत जाते. समरदीप आणि कबीर यांच्यातील अपरिहार्य सामना या सगळ्याच्या केंद्रस्थानी आहे. भूतकाळातील गोष्टी पुन्हा समोर येऊ लागतात आणि वर्तमानावर त्यांचा प्रभाव जाणवू लागतो. सुरुवातीला साध्या कारवाईसारखी वाटणारी गोष्ट पुढे जाऊन गुंतागुंतीच्या घटनांची मालिका उभी करते, जिथे प्रत्येक पाऊल पुढील घडामोडींना दिशा देत राहते आणि परिस्थिती अधिकच गंभीर होत जाते. नियंत्रण सुटू लागल्यावर खऱ्या अर्थाने सूत्रे कोणाच्या हातात आहेत, हा प्रश्न उभा राहतो. या शोबद्दल आणि आपल्या भूमिकेबद्दल बोलताना साकिब सलीम म्हणाला, “कप्तानमुळे मला भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक आणि आतून संघर्षांनी भरलेला असा एक वेगळा पैलू शोधण्याची संधी मिळाली. एसएसपी समरदीप ही भूमिका साकारताना मला अशा पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत शिरावे लागले, जो नेहमी नियमांनुसार वागत नाही, पण काम पूर्ण करण्यावर त्याचा ठाम विश्वास असतो. तो सतत आपल्या भूतकाळाशी झुंजत असतो आणि त्याच वेळी वर्तमानावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. हाच अंतर्गत ताण त्याच्या निर्णयांना आकार देतो. ही अनेक पदर असलेली व्यक्तिरेखा साकारताना माझ्यासाठी हा प्रवास आव्हानात्मक आणि समाधानकारक दोन्ही ठरला. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर प्रेक्षकांनी हे विश्व अनुभवावे, यासाठी मी खूप उत्सुक आहे.” या सीरिजबद्दल बोलताना ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे हेड ऑफ कंटेन्ट अमोघ दुसाद म्हणाले, “कप्तान ही सत्ता, संघर्ष आणि वैयक्तिक प्रेरणा यांच्या छेदबिंदूवर उलगडणारी कथा आहे, जिथे प्रत्येक निर्णयाचे महत्त्व जाणवते. या कथानकाची खासियत म्हणजे यात पोलीस नाट्य, ॲक्शन आणि व्यक्तिरेखांवर आधारित कथाकथन यांची प्रभावी सांगड घातली आहे.



## महावीर प्रतिष्ठानच्यावतीने थंडपेय वाटप

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर येथील महावीर प्रतिष्ठानच्या वतीने आज नगरमधून निघालेल्या पदयात्रेत सुमारे ४ हजार भाविकांना थंडपेय वाटप करण्यात आलेया उपक्रमाचे हे १६ वे वर्षे असून आनंदधाम येथे त्यासाठी मोठा पेंडॉल टाकण्यात आला होता.

उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शखाली हे मंडळ विविध उपक्रम राबवित असते त्यातील हा एक उपक्रम आहे यवेली मंडळाचे अध्यक्ष हर्षल बोरा,राकेश भंडारी,अमित फिरोदिया,स्वप्नील मुनोत, आशिष चोपडा,अक्षय मुनोत, आनंद गांधी, दर्शन चाणोदिया, गौरव पोखरणा , निखिल गांधी,रोहित भंडारी, रितेश पारेख,प्रीतम गुगळे,परेश बोगावत,प्रसाद बोरा,रुपेश पटवा,सचिन लुनिया,विशाल पारेख, लक्ष्मीकांत तिवारी , श्रीपाल शिंगी, पुष्कर तांबोळी, चेतन भंडारी,अमोल निस्ताने आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. हर्षल बोरा म्हणाले प्रतिष्ठान हे आपल्या सामाजिक कार्यासाठी राज्यात प्रसिद्ध आहे,दरवर्षी गणेशोत्सवात प्रबोधनात्मक देखावे सादर करते ,मंडळ फिरते अन्नछत्र चालवत असून त्याचा असंख्य गरजू फायदा घेतात तसेच अहिल्यानगर करंडक हि राज्यस्तरीय स्पर्धा हि घेते व अनेक उपक्रम राबवित असते आज जैन धर्मातील सर्वात महत्त्वाचा सण असून, भगवान महावीरांचा २६२४ वा जन्मदिवस (कल्याणक) म्हणून साजरा केला जातो, या दिवशी अहिंसा, सत्य आणि 'जगा आणि जगू द्या' या संदेशाचे स्मरण करून मिरवणुका आयोजित केल्या जातात. त्यासाठी मंडळ हे दरवर्षी थंडपेय वाटप करत असते.

## अकोले तालुक्यात अवकाळी व गारांमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा : सुशांत आरोटे

गणोरे : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यामध्ये अवकाळी पावसामुळे आणि गारांमुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसानी झाल्या असून प्रशासनाने सदर नुकसानीची गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून दिलासा द्यावा अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सुशांत आरोटे यांनी केली आहे. अकोले तालुक्यात सर्वदूर सोमवारी सायंकाळी मोठ्या प्रमाणात अवकाळी पावसाने हजेरी लावत गहू, कांदा, डाळिंब, मका व इतर अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. देवठाण, समशेरपूर, गणोरे, ब्राम्हणवाडा गावांसह अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात गारा पडल्याची ही दिसत असून, गारांमुळे ही अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले आहेत. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक हातातून गेल्याचे शेतकरी सांगत असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी गोठ्यांची नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे, तरी प्रशासनाने पडझड झालेल्यांयांचे गोठ्याचे, घरांचे व शेतीमध्ये नुकसान झालेल्या पिकांचे बांधावर जाऊन तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देऊन दिलासा द्यावा.

अशी आग्रही मागणी स्वाभिनामी शेतकरी संघटनेच्या वतीने उपाध्यक्ष सुनील पुंडे, कार्याध्यक्ष संतोष उगले टेलर, युवक अध्यक्ष शुभम आंबरे, सोमनाथ आहेर ,प्रवीण आहेर, ध्यानेश्वर आहेर आदींसह शेतकऱ्यांनी केली आहे.

## रोहित बिच्चेवार यांनी मारली बाजी

हिमायतनगर : (स. गांवकरी)

जिद्द आणि चिकाटी असेल तर परिस्थितीवर मात करता येते, हे सरसम बु येथील रोहित संदीप बिच्चेवार यांनी सिद्ध केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत नांदेड जिल्हा पोलीस पदावर बाजी मारली आहे, या यशा मुळे परिसरात अभिमानाचे वातावरण आहे. वडील गेल्यानंतर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगराखाली न दबून जाता, रोहित बिच्चेवार यांच्या आईने कुटुंबाचा गाडा खंबीरपणे ओढला. "आपल्या मुलांना शिकवून मोठे करायचे" या जिद्दीने त्यांनी रोहित ला नेहमीच प्रोत्साहन दिले. आईचे कष्ट आणि जिद्द पाहून रोहित बिच्चेवार मैदानी चाचणी व अभ्यासात स्वतःला झोकून दिले अखेर या परिश्रमाचे फळ मिळाले असून नांदेड जिल्हा पोलीस दलात पोलीस म्हणून निवड झाली आहे.

## लक्कडकोट येथे केंद्रीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

किनवट तालुका : (स. गांवकरी)



जि. प. प्रा. शाळा लक्कडकोट येथे केंद्रीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला मोहपुर केंद्राचे केंद्रप्रमुख तसेच जि. प. प्रा. शाळा सिंदगी तांडा येथील मुख्याध्यापक कवटीकवार हे अध्यक्ष व प्रशासकीय मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. गट ग्रामपंचायत लक्कडकोट व ग्रामपंचायत मारेगाव (खालचे) येथील सरपंच गणपत भोपे यांनी उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर जि. प. प्रा. शाळा लक्कडकोट येथील चौथीतील विद्यार्थिनी समृद्धी किशोर शिंदे हिने स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे म्हणून ग.णू जाधव, सचिन नरवाडे, चंद्रशेखर सर्पे उपस्थित होते. मोहपुर केंद्र शाळेची राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून निवड झाल्याबद्दल संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच जि. प. प्रा. शाळा सिंदगी तांडा येथील शिक्षक दत्ता डुकरे यांचा मुलगा राजकुमार दत्ता डुकरे याने नवोदय परीक्षेत यश मिळवून पात्रता मिळविल्याबद्दल त्याचा व शाळेचा गौरव करण्यात आला. यानंतर उपाध्यक्ष गणपत भोपे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष कवटीकवार यांनी प्रास्ताविकात शाळांनी SQAAF नोंदणी करून आवश्यक माहिती भरावी, तसेच विनोबा ॲपची नोंदणी पूर्ण करावी, असे सांगितले. राज्य शासनाच्या ‘डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान शिक्षण वृद्धी कार्यक्रम’ अंतर्गत खान अकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान विषयांचे शिक्षण उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यासोबतच इतर शैक्षणिक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी संतोष दासरवार यांनी परिश्रम घेतले तर विठ्ठल झाडे यांनी सहयोग दिले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन रुपेश मुनेश्वर यांनी केले. कार्यक्रमास परिसरातील शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज यांचा जिवंत देखावा लक्षवेधी

पारनेर : (स. गांवकरी)



निघोज येथील सकल हिंदू समाज व श्रीराम जन्मोत्सव समीती यांनी रात्री ७ ते ९ वाजेपर्यंत निघोजच्या पेठेतून काढलेल्या प्रभू श्रीराम यांच्या मिरवणुकीत छत्रपती संभाजी महाराज यांचा जिवंत देखावा दाखवण्यात आला जवळपास दोन तासांच्या या मिरवणुकीत पाच ठिकाणी हा देखावा दाखवण्यात आला. प्रसिद्ध अभिनेते अर्जुन आंबेकर व त्यांच्या सहकलाकारांनी या देखाव्यात प्रमुख भूमिका घेतली होती. मिरवणुकीत जय श्रीराम तसेच छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयजयकाराच्या घोषनांनी परिसर निनादून गेला होता. मळगंगा मंदीर ते ग्रामपंचायत चौक, ते वेस तसेच मारुती मंदिर ते नवी पेठेतून ही मिरवणूक एस टी बस स्थानक त्यानंतर या मिरवणूकीची सांगता मळगंगा मंदीराजवळ करण्यात आली. यावेळी प्रभू श्रीराम यांची महाआरती करण्यात आली. श्रीराम प्रभू रामचंद्र यांचा भव्य पुतळा, विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी यामुळे वातावरण भगवे झाले होते.

गेली अनेक वर्षात निघोज आणी परिसरात पहिल्यांदाच छत्रपती संभाजी महाराज यांचा जिवंत देखावा सादर केल्याने हा देखावा पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. यावेळी सकल हिंदू समाज समीतीचे भिमराव लामखडे, गणेश वराळ, बाळासाहेब जगताप, विलासराव हारदे,ठकाराम गायखे आदी तसेच त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांनी या मिरवणुकीचे नियोजन केले होते. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकजदादा कारखिले, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे मार्गदर्शक सुनिल दादा पवार, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा मळगंगा यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, मळगंगा देवी यात्रा समीतीचे विश्वस्त भास्करराव कवाद तसेच विविध संस्थाचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच महिला भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उन्हाळी-२६ परीक्षांसाठी अर्ज सादरीकरणास मुदतवाढ

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या उन्हाळी-२०२६ परीक्षांसाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उन्हाळी-२०२६ परीक्षांना दि १६ एप्रिल २०२६ पासून सुरुवात होणार आहे. या परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकृतीची अंतिम मुदत दि २९ मार्च २०२६ होती, तर शुल्क भरण्याची अंतिम दि३० मार्च २०२६ होती. तथापि, अनेक महाविद्यालयांकडून अर्ज सादरीकरणाबाबत आलेल्या विनंत्या व विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून ही मुदत वाढविण्यात आली आहे.

## मराठवाड्याच्या डॉक्टरचा जागतिक पराक्रम!

### पाय वाचवण्याच्या नवीन तंत्रावर डॉ. मनोज हंबर्डे यांचे संशोधन प्रसिद्ध

नांदेड : (स. गांवकरी)



मराठवाड्याचे पहिले 'व्हॅस्कुलर आणि एंडोव्हॅस्कुलर सर्जन' डॉ. मनोज शंकरराव हंबर्डे यांनी वैद्यकीय क्षेत्रात एक मोठी कामगिरी केली आहे. त्यांचे 'क्रॉनिक लिंब थ्रेटनिंग इस्केमिया' (CLTI) म्हणजेच पाय गमावण्याची भीती असलेल्या रुग्णांवरील संशोधन नुकतेच प्रतिष्ठित 'इंडियन जर्नल ऑफ व्हॅस्कुलर अँड एंडोव्हॅस्कुलर सर्जरी' (IJVES) मध्ये प्रसिद्ध झाले आहे.

संशोधनाचे महत्त्व,मधुमेहामुळे किंवा पायातील रक्तवाहिनी मधील अडथळ्यांमुळे (Arterial Occlusion) ज्या रुग्णांचे पाय कापण्याची वेळ येते, अशा रुग्णांवर पायातील रक्तवाहिनी मध्ये 'अँजिओप्लास्टी (Angioplasty)' करताना वापरल्या जाणाऱ्या एका विशेष तंत्रावर (Short Balloon Inflation) हे संशोधन आधारित आहे. अशा प्रकारचे हे महाराष्ट्रातील पहिलेच संशोधन असून, गुडघ्याखालील रक्त वाहिन्यांच्या (Infrapopliteal) उपचारांसाठी या तंत्राचा वापर करणारे हे जगातील पहिलेच प्रकाशित संशोधन ठरले आहे. स्थानिक रुग्णांना मोठा दिलासा मिळेल डॉ. मनोज हंबर्डे हे मराठवाडा विभागातील पहिलेच पूर्णवेळ 'व्हॅस्कुलर अँड एंडोव्हॅस्कुलर सर्जन' (Vascular & Endovascular Surgeon) आहेत. आतापर्यंत अशा गंभीर आजारांसाठी रुग्णांना मुंबई, पुणे किंवा हैदराबादला धाव घ्यावी लागत असे. मात्र, डॉ.मनोज हंबर्डे यांच्या रूपाने आता जागतिक दर्जाची 'व्हॅस्कुलर केअर' सेवा लवकरच नांदेड व मराठवाड्यामध्ये उपलब्ध होणार आहे. यामुळे शेकडो रुग्णांचे पाय कापण्या पासून वाचवणे आता स्थानिक पातळीवर शक्य होईल. लवकरच ते हंबर्डे उरोकेअर येथे या संबंधी रूग्णाची ते तपासणी सुरू करणार असुन मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये रूग्णांची नावनोंदणी करून तपासणी करणार आणि जागतिक दर्जाचा उपचार सुरू करणार असल्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचा या यशाबद्दल शंकरनगरी असर्जन या निवासस्थानी मित्र परिवार व कुटुंबातील व डॉक्टर मंडळींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## हिमायतनगरमध्ये घाणीचे साम्राज्य; नागरिक त्रस्त

हिमायतनगर : (स. गांवकरी)



हिमायतनगर शहरातील विविध भागांमध्ये सध्या घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र दिसत असून या दुर्गंधी मुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुख्य रस्ते, गल्लीबोळात तसेच सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे मोठ मोठे ढिगारे जमा झालेले दिसत आहेत. नियमित साफसफाई होत नसल्यामुळे दुर्गंधी पसरली असून परिसर अस्वच्छ झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक दिवसांपासून कचरा उचलला जात नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. यामुळे डास, माशा यांचे प्रमाण वाढले असून आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नगरपालिकेकडून स्वच्छतेकडे जाणिव पूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून येत असून परिसरातील नागरिक असे म्हणतात की संबंधित प्रशासनाने या समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन नियमित साफसफाईची व्यवस्था करावी, तसेच कचरा व्यवस्थापन प्रभावीपणे राबवावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## एअरटेलकडून नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड मध्ये US$1 अब्ज गुंतवणुकीची घोषणा

पुणे : (समर्थ गांवकरी)

airtel CARLYLE ALPHA WAVE

भारती एअरटेल यांनी आज जाहीर केले की अल्फा वेव्ह ग्लोबल, कार्लाइल आणि अँकरेज कॅपिटल यांच्या सहयोगी संस्थांमार्फत नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड मध्ये १ अब्ज अमेरिकन डॉलर गुंतवणूक करण्यात येणार आहे. नेक्स्ट्रा ही एअरटेलची डेटा सेंटर व्यवसायातील उपकंपनी असून, भारतभर तिच्या नेटवर्कचा विस्तार आणि वाढीला गती देण्यासाठी ही गुंतवणूक केली जात आहे. एअरटेल देखील या गुंतवणूक फेरीत सहभागी होणार आहे. या करारानुसार, अल्फा वेव्ह ग्लोबल ४३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स, कार्लाइल २४० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आणि अँकरेज कॅपिटल ३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स गुंतवणूक करणार आहेत, तर उर्वरित रक्कम एअरटेलकडून दिली जाईल. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर आवश्यक समायोजनांच्या अधीन राहून गुंतवणूकदारांचा अंतिम समभाग वाटा निश्चित केला जाईल. नेक्स्ट्रा मध्ये एअरटेलचा नियंत्रक हिस्सा कायम राहणार आहे. हा व्यवहार भारतातील नियामक मंजुरींवर अवलंबून आहे. Nxtra – भारतातील पहिली डेटा सेंटर कंपनी ज्यांनी पूर्वानुमानाधारित देखभाल, ऊर्जा कार्यक्षमता आणि स्वयंचलित कार्यप्रणालीसाठी मोठ्या प्रमाणावर AI चा वापर केला आहे – या निधीचा उपयोग आपल्या वाढीच्या योजना गतीमान करण्यासाठी करणार आहे. कंपनी आपली पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर विस्तारण्याची आणि सेवा पोर्टफोलिओ अधिक व्यापक करण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे देशभरातील उद्योग, hyperscalers आणि सरकारी संस्थांच्या बदलत्या गरजा पूर्ण करता येतील.

भारताचा डेटा सेंटर क्षेत्र सध्या वेगाने वाढत आहे, ज्यामागे उद्योगांमधील डिजिटल परिवर्तनाचा वेग, क्लाउड सेवांचा वाढता स्वीकार आणि हायपरस्केलरकडून वाढती मागणी ही प्रमुख कारणे आहेत. सॅव्हिल्स इंडिया च्या अहवालानुसार, २०२४ ते २०३० दरम्यान भारतातील डेटा सेंटर बाजार सुमारे २१% चक्रवाढ वार्षिक वृद्धीदराने (CAGR) वाढून जवळपास एअरटेलचे कार्यकारी उपाध्यक्ष गोपाल विट्टल म्हणाले, “नेक्स्ट्रा मध्ये आम्ही भारतातील अत्याधुनिक आणि शाश्वत डेटा सेंटर नेटवर्क उभारले आहे, जे उद्योग, हायपरस्केलर आणि सरकारी संस्थांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेले आहे. सध्या आमच्याकडे सुमारे ३०० मेगावॅट क्षमता आहे आणि पुढील काही वर्षांत ती 1 GW पर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे, ज्यामुळे सुमारे २५% बाजार हिस्सा मिळवण्याचा आमचा उद्देश आहे.”

ते पुढे म्हणाले, “जागतिक गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान भागीदारांसोबतची धोरणात्मक भागीदारी आमच्या वाढीच्या आराखड्याचा मुख्य भाग आहे. यामुळे आम्हाला विस्तार जलद गतीने करता येईल, जागतिक दर्जाचे कौशल्य मिळेल आणि मोठ्या प्रमाणावर पुढील पिढीची डिजिटल पायाभूत सुविधा विकसित करता येईल. मजबूत बाजार मागणी लक्षात घेता, भारताला डेटा सेंटर हब म्हणून अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही गुंतवणूक वाढवण्यास कटिबद्ध आहोत.”

कार्लाइल इंडिया सल्लागार चे भागीदार कपिल मोदी म्हणाले, “आम्ही एअरटेल सोबत मजबूत भागीदारी निर्माण केली आहे आणि नेक्स्ट्रा भारतातील दीर्घकालीन डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रातील वाढीच्या संधींचा लाभ घेण्यासाठी सक्षम स्थितीत असल्याचा आमचा विश्वास कायम आहे. कंपनीने आपल्या क्षमतांचा विस्तार, ग्राहक संबंध अधिक दृढ करणे आणि विस्तारक्षम व्यासपीठ उभारणे यामध्ये लक्षणीय प्रगती साधली आहे. पुढेही एअरटेल आणि नेक्स्ट्रा च्या व्यवस्थापन टीमसोबत कार्य करत कंपनीला भारतातील सर्वात मोठ्या डेटा सेंटर कंपन्यांपैकी एक बनवण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.” रिक गेर्सन, सह-संस्थापक व सीआयओ, अल्फा वेव्ह ग्लोबल, म्हणाले, “अल्फा वेव्ह चे विशेष लक्ष AI-प्रथम (AI-first) व्यवसायांची ओळख पटवणे आणि त्यांना पाठबळ देणे यावर आहे.

# ट्रूकॉलरचे जागतिक युजर्स ५०० दशलक्ष पार

## स्पॅम आणि स्कॅमपासून संरक्षणासाठी लोकांची पहिली पसंती बनले




पुणे : (स. गांवकरी)

जगभरातील सुरक्षित आणि विश्वासार्ह संवादासाठी अग्रगण्य प्लॅटफॉर्म असलेल्या ट्रूकॉलरने आज जाहीर केले की, त्यांच्या जागतिक युजरसंख्येने ५०० दशलक्ष (मिलियन) चा टप्पा ओलांडला आहे. संवादामध्ये विश्वास निर्माण करण्याच्या कंपनीच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या प्लॅटफॉर्मवरील युजर्सची संख्या सातत्याने वेगाने वाढत असून, केवळ २०२५ या वर्षातच ५० दशलक्षांहून अधिक नवीन युजर्स यात सामील झाले आहेत. भारतात ट्रूकॉलर वापरणाऱ्यांची संख्या ३५० दशलक्षांहून अधिक झाली असून, भारताबाहेरील युजर्सची संख्या १५० दशलक्षांपेक्षा जास्त आहे. अनाहूत कॉल्स, स्पॅम आणि फसवणूक यांपासून संरक्षणाची गरज जागतिक स्तरावर वाढत असल्यामुळे ही वाढ होत आहे. यावर्षाच्या सुरुवातीला, कंपनीच्या पेड सेवांचा लाभ घेणाऱ्या सबस्क्रायबर्सची संख्या देखील ४ दशलक्षांहून अधिक झाली असून, त्यामुळे कंपनीच्या महसूल स्रोताला आणखी बळकटी मिळाली आहे.

याबाबत कंपनीचे सीईओ ऋषित झुनझुनवाला म्हणाले, “हा आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे, मात्र तो आपण ज्या जगात राहतो त्याचेही प्रतिबिंब आहे. आज दररोज अधिकाधिक लोकांना स्पॅम, स्कॅम आणि अनावश्यक संवाद हाताळण्यासाठी मदतीची गरज भासत आहे. ५०० दशलक्ष युजर्सचा टप्पा गाठल्याने या गरजेचे प्रमाण आणि लोकांचा ट्रूकॉलरवरील विश्वास स्पष्ट होतो. आमचे लक्ष अधिक प्रगत तंत्रज्ञान आणि नव्या वैशिष्ट्यांद्वारे प्लॅटफॉर्म अधिक सक्षम करण्यावर आहे, जे प्रत्येक कॉल किंवा मेसेजपूर्वी, दरम्यान आणि त्यानंतरही युजर्सचे संरक्षण करतील. आमचे अंतिम ध्येय सर्वांसाठी अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह संवादाचे पर्यावरण निर्माण करणे आहे. आता आमचे लक्ष पुढील महत्त्वपूर्ण टप्प्यावर असून, १ अब्ज युजर्सपर्यंत पोहोचण्याचा आमचा निर्धार आहे.”

दर महिन्याला अर्ध्या अब्जाहून अधिक लोक या प्लॅटफॉर्मचा वापर करत असल्यामुळे, ट्रूकॉलर हे केवळ कॉलर आयडेंटिफिकेशन ॲप राहिलेले नाही. ते डिजिटल युगातील सुरक्षित संवादासाठी अत्यावश्यक घटक बनले आहे. ओळख पडताळणे, फसवणूक टाळणे आणि कोणाशी संवाद साधायचा याबाबत सुजाण निर्णय घेण्यासाठी हे एक विश्वासार्ह साधन ठरले आहे. आज ट्रूकॉलरने स्वतःची ओळख जागतिक स्तरावरील उपयुक्त डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून निर्माण केली आहे, जो कोट्यवधी लोकांच्या दैनंदिन संवाद सवयींचा अविभाज्य भाग बनला आहे. अनोळखी कॉलर्सची ओळख पटवण्यापासून ते फसवणूक रोखणे आणि सुरक्षित मेसेजिंग सक्षम करण्यापर्यंत, हा प्लॅटफॉर्म दैनंदिन वापराचा एक विश्वासार्ह घटक बनला आहे आणि संपूर्ण फोन इकोसिस्टममध्ये सुरक्षित संवाद साधण्यास मदत करतो. जगभरात ५०० दशलक्षांहून अधिक युजर्सना सेवा देत असतानाही, कंपनीची रचना तुलनेने लहान आणि कार्यक्षम आहे. सुमारे ४७० कर्मचाऱ्यांची टीम जागतिक स्तरावर या प्लॅटफॉर्मचे संचालन आणि सातत्याने सुधारणा करत आहे.

# पोलीस निरीक्षक विरल गढवी यांना निरोप



डांग.गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील वघई पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक विरल गढवी यांची अहमदाबाद येथे बदली झाल्याने वघई येथे त्यांना भव्य आणि भावपूर्ण निरोप देण्यात आला. या प्रसंगी विविध राजकीय नेते, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी वर्ग तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून गढवी यांना सन्मानपूर्वक निरोप देत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.पोलीस निरीक्षक गढवी यांनी आपल्या तुलनेने अल्प कार्यकाळात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि कडक प्रशासनामुळे वेगळी ओळख निर्माण केली होती. सुरुवातीला काही प्रमाणात विरोधाला सामोरे जावे लागले असले तरी, आपल्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे आणि जनतेशी जुळवून घेणाऱ्या स्वभावामुळे त्यांनी अल्पावधीतच लोकांचा विश्वास संपादन केला.

निरोप समारंभात भावूक झालेल्या गढवी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले, “कर्तव्य पथ पर जो मिला, ये भी सही वह भी सही.” या शब्दांत त्यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभवांची आठवण करून दिली.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या लोकाभिमुख कार्याची मुक्तकंठाने स्तुती करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्नेहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडलेल्या या समारंभाने अधिकारी आणि नागरिक यांच्यातील घट्ट नात्याची जाणीव करून दिली.

# गारपीट झालेल्या शेतीचे पंचनाम्याचे आदेश

शिवनेरी : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यात दि. ३० मार्च रोजी दुपारी ते सायंकाळी पर्यंत पावसाने व गारपीट झालेल्या भागात शेतीच्या पिकाचे व फळ भागांचे नुकसान झाले आहे . त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी ताबडतोब दिले आहे. याबाबत ग्राम महसूल अधिकारी , ग्रामसेवक कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी आज पाहणी केली आहे .ज्या ठिकाणी खरोखर नुकसान झाले आहे त्याबाबत संयुक्त पंचनामे करण्याचे आदेश देण्यात येतील .

पावसाने व गारपीट झालेल्या भागात शेतकरी यांनी आपल्या गावाचे ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक तसेच कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा.आज सकाळी ११ वा . शिरोली बुद्रुक येथील गाढवे यांच्या शेतातील एक एकर काढून ठेवलेल्या कांदा तसेच साठवलेल्या आरणी मध्ये भरून ठेवलेल्या कांद्याचे नुकसान झाल्याची पाहणी नायब तहसिलदार एस बी गवारी , तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले , पोलीस पाटील अमोल थोरवे , तालुकाध्यक्ष सचिन थोरवे , नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते .

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा केला असून उर्वरित सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे दोन दिवसांमध्ये केले जातील असे आदेश तहसीलदार सिरसट यांनी ताबडतोब दिले अशी माहिती नायब तहसीलदार गवारे यांनी सांगितले.

# द ईस्पोर्टस् नेशन्स कप 2026 तर्फे नॉडविन गेमिंगची नियुक्ती

पुणे: (स. गांवकरी)

द ईस्पोर्टस फाऊंडेशन (ईएफ) तर्फे गेमिंग,ईस्पोर्टस् आणि युथ एंटरटेन्मेंट मध्ये जागतिक आघाडीची कंपनी असलेल्या नॉडविन गेमिंगची द ईस्पोर्टस् नेशन्स कप 2026 (ईएनसी) साठी ऑफिशियल नॅशनल टीम पार्टनर म्हणून नियुक्ती केली आहे.ईएनसी ही ईस्पोर्टस् स्पर्धा असून 2 ते 29 नोव्हेंबर 2026 दरम्यान रियाध येथे सुरू होणार आहे. ईस्पोर्टस फाऊंडेशनला १५० देश आणि क्षेत्रांमधून ६३० होऊन अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत.

# गार्नियर कलर नेचरल्सचा ‘ट्रस्ट कॅम्पेन’ लाँच

## रवीना टंडन-राशा थडानी जोडीतून आई-मुलीच्या नात्याचा उत्सव

पुणे : (स. गांवकरी)

गार्नियर कलर नेचरल्सने अभिनेत्री रवीना टंडनसोबतचा आपला संबंध अधिक मजबूत केला असून आता त्यांच्या मुली राशा थडानीला नवीन कॅम्पेनमध्ये सादर केले आहे. या कॅम्पेनमध्ये खरी आई–मुलीची जोडी दाखवली आहे जी ब्रँडचा मुख्य स्तंभ विश्वास अधोरेखित करते आणि घरबसल्या सहज हेअर कलरिंगचा उत्सव साजरा करते. हे ब्रँडसाठी नैसर्गिक पुढचे पाऊल आहे, ज्यात गार्नियर कलर नेचरल्सची विश्वासार्ह, नैसर्गिक दिसणाऱ्या हेअर कलरची परंपरा रवीना यांच्या पिढ्यानपिढ्या पोहोचणाऱ्या आकर्षणासोबत आणि राशाच्या नव्या पिढीच्या ताजेपणा व जोडणीसोबत एकत्र केली आहे.



एक आयकॉनिक स्टार म्हणून रवीना, आपल्या मुलीसोबत या कॅम्पेनमध्ये सहज उबदारपणा आणि खरी भावना आणतात. फिल्ममध्ये आई–मुलीमधील एक कोमल, रोजचा क्षण दाखवला आहे, जिथे राशा केस रंगवल्यानंतर आईकडे आत्मविश्वासाची खात्री मागते. त्यानंतर होणारा साधा पण अर्थपूर्ण संवाद दाखवतो की आईची मान्यता आत्मविश्वास निर्माण करण्यात किती महत्त्वाची असते. त्यांची नैसर्गिक केमिस्ट्री आणि सहज संवाद हा क्षण अत्यंत रिलेटेबल बनवतो, दाखवतो की सौंदर्याचे निर्णय अनेकदा विश्वास, सामायिक अनुभव आणि मान्यतेच्या आरामावर आधारित असतात. मोहीमेबद्दल आपले विचार व्यक्त करताना रवीना टंडन म्हणाल्या, "आई म्हणून यापेक्षा मोठं काहीच नाही की तुमचं मूल तुमच्या निवडीवर विश्वास ठेवतं, आणि यापेक्षा दिलासा देणारी गोष्ट नाही की ते स्वतःच्या निवडी आत्मविश्वासाने स्वीकारतात. हा कॅम्पेन त्या हृदयस्पर्शी, शक्तिशाली नात्याला सुंदरपणे पकडतो. हे खरे आणि रिलेटेबल वाटते, अगदी माझ्या आणि राशाच्या नात्यासारखे. मी नेहमीच ज्यावर मला विश्वास आहे तेच निवडले आहे, आणि गार्नियर कलर नेचरल्स नेहमीच माझी ती निवड राहिली आहे."

आपला दृष्टिकोन मांडताना राशा थडानी म्हणाल्या, "मला वाटतं आपण सगळेच, काही ना काही प्रकारे, आपल्या आईकडून मान्यता शोधतो, विशेषतः जेव्हा आपण काही नवीन करून पाहतो.

# ॲक्सिस मॅक्स लाईफ आणि येस बँककडून धोरणात्मक उत्कृष्टतेच्या २१ वर्षांचा गौरव; 'डिजिटल- फर्स्ट' भविष्याकडे लक्ष केले केंद्रित

AXIS MAX LIFE INSURANCE

पुणे : (स. गांवकरी)

ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लिमिटेड पूर्वाश्रमीची मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि येस बँक लिमिटेड त्यांच्या धोरणात्मक बँकअश्युरन्स भागीदारीचा २१ वा वर्धापन दिन साजरा केला. दोन दशकांहून अधिक काळ चाललेल्या समन्वयाच्या निमित्ताने या दोन्ही संस्थांनी डिजिटल-फर्स्ट डिलिव्हरी आणि हायपर-पर्सनलाइज्ड प्रोटेक्शन सोल्यूशन्सद्वारे पुढच्या पिढीतील ग्राहकांच्या अनुभवात सुधारणा घडवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. मागील एकवीस वर्षांत हे सहकार्य उद्योगातील सर्वात यशस्वी सहकार्यांपैकी एक म्हणून विकसित झाले आहे. येस बँकेच्या १३०० पेक्षा जास्त शाखांच्या येस बँकेच्या भारतभरातील नेटवर्कचा लाभ घेत या भागीदारीने सुमारे १८.०३ लाख पॉलिसीधारकांचे भविष्य सुरक्षित करून १.५० लाख कोटीं रूपयांच्या विम्याच्या रकमेचा आकडा पार केला. ॲक्सिस मॅक्स लाइफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले, " येस बँकेबरोबरची आमची २१ वर्षांची भागीदारी ग्राहक प्रथम दृष्टीकोन अधोरेखित करते. भौगोलिक बाबींची पर्वा न करता प्रत्येक नागरिकासाठी आर्थिक सुरक्षा हा एक संघर्षरहित, समृद्ध करणारा अनुभव असल्याची खात्री करण्यासाठी आम्ही प्रत्येक ग्राहक समूहातील जीवाचे रक्षण करण्यासाठी, एआय आणि अखंड डिजिटल एकात्मतेचा वापर करण्यास वचनबद्ध आहोत." येस बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत कुमार म्हणाले, येस बँकेच्या डिजिटल पायाभूत सुविधा आणि व्यापक शाखा नेटवर्कच्या माध्यमातून आमच्या ग्राहकांच्या बँकिंग प्रवासात विम्याचे अखंडपणे एकत्रीकरण करण्याची आमची क्षमता ही भागीदारी दर्शवते. ही भागीदारी जसजशी अधिक व्यापक होत जाईल, तसतसा आमचा प्रयत्न भारतीय बाजारपेठेतील निकृष्ट दर्जाच्या विम्याचे लोकशाहीकरण करण्याचा असेल. आम्हाला खात्री आहे की ही युती '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या राष्ट्रीय दृष्टीकोनाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल." ही भागीदारी तिसऱ्या दशकात प्रवेश करत असताना या दोन्ही कंपन्यांनी एका मोठ्या राष्ट्रीय मोहिमेकडे लक्ष केंद्रित केले आहे. टियर ३ आणि टियर ४ शहरांमधील संरक्षणाची दरी भरून काढत ही आघाडी एमएसएमई आणि अगदी तळागाळातील जनतेसाठी आर्थिक समावेशकतेला प्राधान्य देत आहे.

आर्थिक संरक्षणाकडे केवळ दुय्यम सेवा म्हणून नव्हे तर भारतातील उदयोन्मुख उद्योजक आणि ग्रामीण कुटुंबांसाठी मूलभूत सक्षमकर्ता म्हणून पाहत, '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या दृष्टीकोनातून आयआरडीएआयच्या देशव्यापी उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी दोन्ही संस्था वचनबद्ध आहेत. ॲक्सिस मॅक्स लाइफ आणि येस बँक प्रत्येक भारतीयांच्या दारापर्यंत संरक्षणाचे कवच आणण्यासाठी, लवचिक आणि आत्मनिर्भर भारताला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहेत.

# दिव्यांग हक्कांबाबत जागरूकता कार्यक्रम

पुणे : (स. गांवकरी)

नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल पीपल (एनसीपीईडीपी) तर्फे दिव्यांगांचे हक्क अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेण्यासाठी डिसेबिलिटी रिपोर्टिंग वर मार्गदर्शक पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.याबाबत माजी पत्रकार व एनसीपीईडीपीचे सल्लागार डॉ.नवनीत आनंद व एनसीपीईडीपी चे उपक्रम व्यवस्थापक विनित बी. यांनी माहिती दिली. महाराष्ट्रामध्ये दिव्यांग व्यक्ती हक्क कायद्याच्या अमंलबजावणीवरील एक पायाभूत अभ्यासातील अलीकडील निष्कर्षांच्या पार्श्वभूमीवर अधिक सहभागाचे आवाहन करण्यात आले. या अभ्यासात असे दिसून आले आहे की,केवळ 26 टक्के दिव्यांग व्यक्ती रोजगारात आहेत,तर 56 टक्के व्यक्तींना कायद्याबाबत माहिती नाही.केवळ 6 टक्के लोकांना सार्वजनिक वाहतूक सुलभ वाटते आणि जवळपास 50 टक्के लोकांना नियमित आरोग्यसेवा मिळत नाहीत.या निकषांवरून हे स्पष्ट होते.

# किंगफिशर स्मूथ महाराष्ट्रात लॉन्च

- किंगफिशरच्या मुख्य स्ट्राँग बिअर पोर्टफोलिओचा विस्तार

पुणे : (स. गांवकरी)

HEINEKEN कंपनीचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेड (UBL) ने आज महाराष्ट्रात किंगफिशर स्मूथ लॉन्च केल्याची घोषणा केली. किंगफिशर पोर्टफोलिओमधील हा एक महत्त्वाचा नवीन प्रकार असून, तो मुख्य स्ट्राँग बिअर विभागात ब्रँडची उपस्थिती अधिक मजबूत करतो. कंपनी सध्या जास्त विक्री होणाऱ्या हंगामासाठी तयारी करत आहे. या लॉन्चमुळे किंगफिशर स्मूथला वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. मजबूत रिटेल नेटवर्क आणि मोठा ग्राहक वर्ग असलेल्या महाराष्ट्रात विस्तारासाठी मोठी संधी आहे. यापूर्वी राजस्थान आणि कर्नाटकमध्ये किंगफिशर स्मूथला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ज्यांना अधिक स्मूथ आणि सहज पिण्याचा अनुभव हवा आहे अशा ग्राहकांसाठी किंगफिशर स्मूथ तयार करण्यात आले आहे. यात चवीशी तडजोड न करता संतुलित फ्लेवर मिळतो. आयात केलेल्या हॉप्सचा वापर करून आणि कोणतीही साखर न घालता ही बिअर तयार केली जाते. त्यामुळे ती स्वच्छ आणि स्मूथ फिनिश देते, तसेच स्ट्राँग बिअर पिणाऱ्यांना आवडणारी ताकदही राखते. त्यामुळे ती निवांत प्रसंगांसाठी योग्य ठरते.




या लॉन्चबद्दल बोलताना, युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडचे चीफ मार्केटिंग ऑफिसर विक्रम बहल म्हणाले, “किंगफिशर स्मूथद्वारे आम्ही अशा बिअरकडे वळणाऱ्या ग्राहकांच्या गरजेला प्रतिसाद देत आहोत ज्यात चव आणि ताकद यांचा उत्तम मेळ असतो. त्याच्या स्मूथ चवीमुळे, किंगफिशर स्मूथ विविध सामाजिक प्रसंगांसाठी योग्य ठरेल आणि मित्रांसोबतच्या निवांत क्षणांसाठी खास ठरेल.” किंगफिशर स्मूथमुळे किंगफिशर स्ट्राँगसोबत ब्रँडच्या प्रमुख उत्पादनांच्या श्रेणीत आणखी पर्याय उपलब्ध होतात. सध्या हे उत्पादन मुंबई आणि पुण्यातील प्रमुख रिटेल दुकानांमध्ये उपलब्ध आहे आणि एप्रिलपासून संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध होईल. याची किंमत 330 मि.ली. बाटलीसाठी ₹125, 330 मि.ली. कॅनसाठी ₹120, 500 मि.ली. कॅनसाठी ₹155 आणि 650 मि.ली. बाटलीसाठी ₹200 आहे.

# वघई रेंजमध्ये बिबट्याचा धुमाकूळ; वासरावर हल्ला

## ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

डांग गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील दक्षिण वन विभागांतर्गत येणाऱ्या वघई रेंजमधील वघई नगर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वघईतील भरवाड फलियामध्ये काल उशिरा रात्री बिबट्याने हल्ला करून पशुपालकाच्या गोठ्यात बांधलेल्या वासराचे मारण केले. घटनेच्या माहितीनुसार, पशुपालकाने नेहमीप्रमाणे जनावरे गोठ्यात बांधली होती. मात्र रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत बिबट्याने अचानक हल्ला चढवला. सकाळी पशुपालक गोठ्यात गेल्यावर वासरू मृत अवस्थेत आढळल्याने ते हादरून गेले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. रहिवासी भागात बिबट्याचा वावर वाढल्याने विशेषतः लहान मुले आणि जनावरांच्या सुरक्षेबाबत पालक आणि पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

स्थानिकांनी तात्काळ वघई वन विभागाला कळविल्यानंतर वनकर्मचाऱ्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली असून पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.वघईतील नागरिकांनी वन विभागाकडे मागणी केली आहे की, मानवी वस्तीमध्ये आलेल्या या बिबट्याला लवकरात लवकर पकडण्यात यावे आणि परिसरात रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी, जेणेकरून भविष्यात अशा घटना टाळता येतील.

# ओरियंट इलेक्ट्रिकचा ‘एरो 02’ लाँच

## भारतातील पहिला ऑक्सिजन एनरिच्ड सिलिंग फॅन बाजारात : बायो-ऑक्सी प्लाझ्मा आयन+ तंत्रज्ञानाने घरातील हवा अधिक शुद्ध व ताजीतवानी

पुणे : (समर्थ गांवकरी)

orient electric

सीकेए बिर्ला ग्रुपअंतर्गत असलेल्या ओरियंट इलेक्ट्रिक लिमिटेडने भारतातील पहिला ऑक्सिजन एनरिच्ड सिलिंग फॅन ‘एरो 02’ लाँच केला आहे. हा अत्याधुनिक पंखा केवळ हवा फिरवण्यापुरता मर्यादित नसून घरातील हवा अधिक ताजीतवानी आणि आरोग्यदायी बनवण्याचा दावा कंपनीने केला आहे.

‘एरो 02’ हा पंखा पेटंटेड बायो-ऑक्सी प्लाझ्मा आयन+ तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, तो हवेत ॲक्टिव्ह आयन्स सोडून पीएम 2.5 कण, धूर आणि घातक सूक्ष्मजंतू कमी करण्यास मदत करतो. यामुळे घरातील हवा अधिक शुद्ध होत असून ऑक्सिजनचे प्रमाण वाढण्यास सहाय्य होते.

आजच्या शहरी जीवनशैलीत लोक मोठ्या प्रमाणात बंद व एअर कंडिशन्ड जागांमध्ये वेळ घालवत असल्याने हवा जड होणे, थकवा येणे आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होणे ही सामान्य बाब झाली आहे. या पार्श्वभूमीवर ‘एरो 02’ हा पंखा आरामदायी श्वसन, थकवा कमी करणे आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मदत करणारा उपाय म्हणून सादर करण्यात आला आहे.

ओरियंट इलेक्ट्रिकचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ रविंद्र सिंग नेगी म्हणाले, “आजच्या ग्राहकांना केवळ हवा फिल्टर करणारे उपाय नकोत, तर देखभालीशिवाय दीर्घकालीन समाधान हवे आहे. ‘एरो 02’ हा त्याच गरजेची पूर्तता करतो. बायो-ऑक्सी प्लाझ्मा तंत्रज्ञानामुळे घरातील हवा २४ तास शुद्ध आणि ऑक्सिजनयुक्त ठेवता येते.”

एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत झालेल्या चाचण्यांनुसार, या फॅनमुळे ८ तासांत ऑक्सिजनचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. तसेच $NO_2$, $SO_2$ आणि $CO_2$ सारखे घातक वायू ७५ टक्क्यांपर्यंत कमी होतात. याशिवाय, हवेतल्या सूक्ष्मजंतूंमध्ये ९९.९९ टक्क्यांपर्यंत घट आणि एअर क्वालिटी इंडेक्समध्ये सुमारे ६० टक्क्यांपर्यंत सुधारणा झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

३८ वॅट बीएलडीसी मोटर आणि १२०० मिमी एअरोडायनॅमिक ब्लेड्समुळे हा पंखा २५० सीएमएम हवा प्रवाह देतो. यामुळे शक्तिशाली, एकसमान आणि अतिशय शांत कार्यक्षमता मिळते. तसेच ॲडजस्टेबल कॅनोपी, ‘पॉईंट एनीव्हेअर’ रिमोट आणि हिवाळ्यात उपयोगी पडणारा रिव्हर्स रोटेशन मोड यांसारखी वैशिष्ट्ये वापर सुलभ करतात.

विशेष म्हणजे, बायो-ऑक्सी प्लाझ्मा आयन+ प्रणाली ही हवा फिरवण्यापासून स्वतंत्रपणेही कार्यरत राहू शकते, ज्यामुळे सर्व ऋतूंमध्ये आणि एअर कंडिशन्ड वातावरणातही सातत्याने ऑक्सिजन समृद्ध हवा मिळते.

‘एरो 02’च्या लाँचद्वारे ओरियंट इलेक्ट्रिकने पारंपरिक पंख्यांच्या संकल्पनेपलीकडे जाऊन ‘हवा पसरवण्यापासून ते हवा रूपांतरित करण्यापर्यंत’ अशी नवी दिशा दिली असून, भारतीय घरांसाठी तंत्रज्ञानाधारित प्रीमियम नाविन्याची नवी वाट खुली केली आहे.